# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. २८/०८/२०१९

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दि. २८/०८/२०१९ रोजी सभा सुचना क्र. ०७ दि. २२/०८/२०१९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. पिठासीन अधिकारी श्री. रवि व्यास हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. व्यास रवि वासुदेव | सभापती |
| २. | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४. | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५. | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह | सदस्य |
| ६. | श्री. राजीव मेहरा | सदस्य |
| ७. | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ८. | श्रीम. वर्षा गिरधर भानुशाली | सदस्या |
| ९. | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | सदस्य |
| १०. | श्रीम. निला बर्नाड सोन्स | सदस्या |
| ११. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| १२. | श्रीम. दिप्ती शेखर भट्ट | सदस्या |
| १३. | श्रीम. वंदना विकास पाटील | सदस्या |
| १४. | श्रीम. वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| १५. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्या |

**मा. सभापती :-**

सभेला सुरुवात करण्यात यावी.

**नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दि. २८/०८/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०७ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे**. प्रकरण क्र. ५३, **दि. ०३/०७/२०१९ व दि. २४/०७/२०१९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**राकेश शाह :-**

दि. ०३/०७/२०१९ व दि. २४/०७/२०१९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**श्रीप्रकाश सिंह :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ५३ :-**

**दि. ०३/०७/२०१९ व दि. २४/०७/२०१९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. ४७ :-**

दि. ०३/०७/२०१९ व दि. २४/०७/२०१९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह** **अनुमोदन :- श्री. श्रीप्रकाश सिंग**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ५४, **विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे तसेच पुर्न:विनियोजन पत्रकास मान्यता देणे.**

धृवकिशोर पाटील :-

**मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सन 2019-20 या वर्षाच्या मंजुर अर्थसंकल्पात विशेष निधी या लेखाशिर्षातंर्गत खालील तरतुदी करण्यात आलेल्या आहेत**

| | | |
|---|---|---|
| 1) | पाणी पुरवठा व मलनि:सारण समिती | रु.1.00 कोटी |
| 2) | विधी व नियोजन समिती | रु.1.00 कोटी |
| 3) | शिक्षण व समाज कल्याण व झोपडपट्टी सुधार, क्रिडा व सांस्कृतिक समिती | रु.1.00 कोटी |
| 4) | आरोग्य परिक्षण, वैद्यकीय सहाय्य, उद्यान व शहर सुशोभिकरण समिती | रु.1.00 कोटी |

**मिरा-भाईंदर शहरात विविध प्रभागात विविध विकासाची कामे मोठ्या स्वरुपात करावयाची असल्याने तसेच शहरात शासनाच्या विशेष निधी अंतर्गत सुरु असलेल्या कामासांठी मनपा निधी कमी पडत असल्याने वरील समितीचा 4.00 कोटीचा निधी हा प्रभागाच्या विकास कामांसाठी पुर्नविनियोजन करुन वर्ग करणे व प्रभागातील कामांचे अंदाजपत्रक करुन त्यास मान्यता घेणेबाबत मा.महापौर यांच्याकडे चर्चा करण्यात आली. त्या अनुशंगाने खालील प्रमाणे प्रस्ताव तयार करण्यात आलेले आहेत.**

| | | |
|---|---|---|
| 1) | भाईंदर (प.) मुर्धा ते उत्तन या प्रभाग समिती क्र.01 अंतर्गत विविध कामे करणे | रु.50,00,000/- |
| 2) | भाईंदर (प.) प्रभाग समिती क्र.02 अंतर्गत विविध कामे करणे | रु.50,00,000/- |
| 3) | मिरारोड (पुर्व) प्रभाग समिती क्र.05 अंतर्गत विविध विकासाची कामे करणे. | रु.50,00,000/- |
| 4) | मिरारोड (पुर्व) व रा.म.क्र.08 वरील प्रभाग समिती क्र.06 अंतर्गत विविध विकासाची कामे करणे. | रु.50,00,000/- |
| 5) | उत्तन येथे काका बॅप्टीस्टा चौक विकसीत करणे (भाग-२) | रु.35,00,000/- |

**उपरोक्त कामांसाठी खालीलप्रमाणे पुर्नविनियोजन प्रस्ताव विहीत नमुन्यात सादर करण्यात येत आहे**

महाराष्ट्र लेखा सहीता **1971** नमुना क्र.**10** नियम **30 (3)**

| या शिर्षातुन | | | | | | ह्या शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान, गौण व | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व | बांधकाम विषयक सेवा | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | प्रस्तावित वाढीची | अभिप्राय |

| | तपशिलवार शिर्ष | | | पर्यंतचे खर्च | | तपशिलवार शिर्ष | वगैरे | | | रक्कम | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 1 | **सार्व. बांधकामे (पृ.क्र.39)** | **महानगरपालिका मार्फत होर्डींग, कॅन्टीलिवर उभारणे/ रिक्षा स्टॅण्ड** | **300.00 लक्ष** | **-** | **300.00 लक्ष** | **सार्व. बांधकामे (पृ.क्र.39)**<br><br>**सार्व. बांधकामे (पृ.क्र.39)** | **नविन रस्ते/ डी.पी. रोड बांधकाम**<br><br>**मूलभूत सुविधा ब) मनपा हिस्सा** | **2000.00 लक्ष**<br><br>**500.00 लक्ष** | **रु.2000.00**<br><br>**500.00 लक्ष** | **200.00 लक्ष**<br><br>**50.00 लक्ष** | **"महानगरपालिका मार्फत होर्डींग, कॅन्टीलिवर उभारणे / रिक्षा स्टॅण्ड"** या लेखाशिर्षात रु.300.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली **31** मार्च **2020** पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातुन **"नविन रस्ते / डी.पी. रोड बांधकाम"** या लेखाशिर्षाखाली रु.**200.00** लक्ष, **"मूलभूत सुविधा ब) मनपा हिस्सा "** या लेखाशिर्षाखाली रु.50.**00** लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| 2 | **विशेष निधी (पृ.क्र.32)** | **पाणी पुरवठा व मलनि:सारण समिती** | **100.00 लक्ष** | **-** | **100.00 लक्ष** | **सार्व. बांधकामे (पृ.क्र.39)** | **मूलभूत सुविधा ब) मनपा हिस्सा** | **500.00 लक्ष** | **500.00 लक्ष** | **95.00 लक्ष** | **"पाणी पुरवठा व मलनि :सारण समिती"** या लेखाशिर्षात रु.100.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली **31** मार्च **2020** पर्यंत होणारा खर्च |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | पाहता सदर लेखाशिर्षातुन **‘मूलभूत सुविधा ब) मनपा हिस्सा’’** या लेखाशिर्षाखाली रु.**95.00** लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| **3** | **विशेष निधी (पृ.क्र.32)** | **विधी व नियोजन समिती** | **100.00 लक्ष** | **-** | **100.00 लक्ष** | **सार्व. बांधकामे (पृ.क्र.39)** | **मूलभूत सुविधा ब) मनपा हिस्सा** | **500.00 लक्ष** | **500.00 लक्ष** | **95.00 लक्ष** | **‘विधी व नि योजन समिती’’** या लेखाशिर्षात रु.100.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली **31** मार्च **2020** पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातुन **‘मूलभूत सुविधा ब) मनपा हिस्सा ’’** या लेखाशिर्षाखाली रु.**95.00** लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| **4** | **विशेष निधी (पृ.क्र.32)** | **शिक्षण व समाज कल्याण व झोपडपट्टी सुधार, क्रिडा व सांस्कृतिक समिती** | **100.00 लक्ष** | **-** | **100.00 लक्ष** | **सार्व. बांधकामे (पृ.क्र.39)** | **मूलभूत सुविधा ब) मनपा हिस्सा** | **500.00 लक्ष** | **500.00 लक्ष** | **95.00 लक्ष** | **‘शिक्षण व समाज कल्याण व झोपडपट्टी सुधार , क्रिडा व सांस्कृतिक समिती ’’** या लेखाशिर्षात रु.100.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली **31** मार्च **2020** |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातुन **"मूलभूत सुविधा ब) मनपा हिस्सा "** या लेखाशिर्षाखाली रु.**95.00** लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| **5** | **विशेष निधी (पृ.क्र.32)** | **आरोग्य परिक्षण, वैद्यकीय सहाय्य, उद्यान व शहर सुशोभिकरण समिती** | **100.00 लक्ष** | **-** | **100.00 लक्ष** | **सार्व. बांधकामे (पृ.क्र.39)** | **मूलभूत सुविधा ब) मनपा हिस्सा** | **500.00 लक्ष** | **500.00 लक्ष** | **95.00 लक्ष** | **"आरोग्य परिक्षण , वैद्यकीय सहाय्य, उद्यान व शहर सुशोभिकरण समिती "** या लेखाशिर्षात रु.100.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली **31** मार्च **2020** पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातुन **"मूलभूत सुविधा ब) मनपा हिस्सा "** या लेखाशिर्षाखाली रु.**95.00** लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे. |

**तरी वरील विकास कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय आर्थिक मान्यता व पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देण्यात येत आहे.**

**राकेश शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

परिवहनच्या गाड्या आपण ठेका पध्दतीने चालवणार आहोत. ही सिस्टम कोणाकडे वापरली जाईल, कशी वापरली जाईल.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**जुबेर इनामदार :-**

विकास कामांना मंजूरीबाबत पहिला विषय आहे. पाणी पुरवठा, मलनिःसारण समिती, झोपडपट्टी सुधार, आरोग्य परिरक्षण, वैद्यकिय, उद्यान ह्या पुर्नःविनियोजनाच्या विषयास १-१ कोटीची तरतूद करण्यात आली होती. ह्या समितीला अशी तरतूद करता येत नाही. ह्या समितीचा पैसा त्या समितीमध्येच खर्च व्हायला पाहिजे. ह्याच्याखाली कामाची रुपरेषा दिलेली आहे. मुर्धा ते उत्तन ह्या प्रभाग समिती क्र. १ च्या अंतर्गत विविध कामे करण्यात आली. कुठली कामे काढली.

**मा. सभापती :-**

समिती अंतर्गत जे आहेत ते.

**जुबेर इनामदार :-**

पुर्नःविनियोजनचा विषय जेव्हा असतो त्या विभागाचा विषय त्या विभागामध्येच खर्च झाला तर स्थायी समितीला अधिकार आहेत आणि तसे नसले तर महासभेची मंजूरी लागते.

**मा. सभापती :-**

तसेच आहे ना.

**जुबेर इनामदार :-**

विषय इथे स्पष्ट होत नाही.

**मा. सभापती :-**

त्या डिपार्टमेंटमध्ये तो खर्च पडतो.

**जुबेर इनामदार :-**

विविध कामे करणे पाणी पुरवठा मलनिःसारण समिती.

**मा. सभापती :-**

पाणी पुरवठा संबंधीतच आहे.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनानी ऑन द हाऊस ऑन द रेकॉर्ड त्याचे उत्तर द्यावे की जो पैसा जिथे आहे तिथेच खर्च केला जाईल. अन्यथा खर्च करता येणार नाही किंवा करणार नाही. प्रभाग समिती क्र. १ मध्ये खर्च करताना त्यांनी पाणी पुरवठा मध्येच केला पाहिजे.

**मा. सभापती :-**

ऑन रेकॉर्डच बोलतो ना.

**जुबेर इनामदार :-**

आपल्याकडे प्रभाग समिती आहेत. पूर्ण मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी काम करणारी समिती आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

ह्या समितीमध्ये काम जास्त असल्यामुळे....................

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाला उत्तर देऊ द्या. धृवकिशोरजी प्रशासन सक्षम आहे ना.

**धृवकिशोर पाटील :-**

ह्या समितीमध्ये काम जास्त आहेत. ह्या समितीने सांगितले आहे की आमच्याकडे भरपूर काम करायची आहेत. त्यामुळे तुम्ही आम्हाला.............

**जुबेर इनामदार :-**

१ कोटीचा जो निधी दिला आहे तो देता येतो का की नाही देता येत हे प्रश्नचिन्ह तसेच आहे.

**मा. सभापती :-**

जुबेरजी ती चर्चा कशाला करता.

**जुबेर इनामदार :-**

त्यावर चर्चा करत नाही म्हणून आमचे ते प्रश्नचिन्ह आहे. समितीचा पैसा तुम्ही स्थायीमध्ये मंजूरी घेता. तो पैसा तिथेच वर्ग करा ना.

**शिवाजी बारकुंड :-**

त्या समिती अंतर्गत सभापती महोदयानी सांगितले तेच माझे उत्तर आहे.

**जुबेर इनामदार :-**

पाणी पुरवठा मलनिःसारण समिती त्यात तुमचा प्रभाग क्र. १ मध्ये किंवा मिरा भाईंदरच्या कुठल्याही क्षेत्रामध्ये............

**शिवाजी बारकुंड :-**

जे म्हटले आहे त्याच्या अंडरमध्येच काम होणार आहे. स्टॅन्डिंगला ते अधिकार आहेत. अदरव्हाइज ते महासभेत गेले असते. परंतु ते स्टॅन्डिंगच्या अधिकारात आहेत. तेवढीच आपण काम करतो.

**जुबेर इनामदार :-**

तीच काम तुम्ही वर्ग करा. म्हणजे जशी काम कराल तशी तरतूद दाखवाल म्हणजे ह्या तरतूदीतून आम्ही केले आहे.

**राजीव मेहरा :-**

मा. सभापती साहेब प्रभाग समिती सदस्य को १०-१० लाख की निधी दी गई। उसका क्या प्रोव्हिजन है।

**मा. सभापती :-**

कौनसा विषय चल रहा है आप क्या बोल रहे हो। ते नंतर बोला पुढचा विषय घ्या.

**दिप्ती भट :-**

तुम्ही सर्व प्रभागमध्ये पैसे देणार आहेत ना.

**मा. सभापती :-**

ठीक आहे ना.

**जुबेर इनामदार :-**

त्यांचा प्रश्न कसा होता प्रभाग समिती निधी.

**दिप्ती भट :-**

आमचे गेल्यावेळचे प्रभागचा निधी आम्हाला भेटला नाही. मग ह्या वर्षीचा परत तुम्ही असे करणार. आमची लिगल काम आहेत तीच होत नाही. आज तीन वर्षापासून आम्ही कच्ची गटार खोदतो. तुम्ही १ वर्षामध्ये २-२ गटार खोदून परत ते सिमेंट रोडसाठी परतते. तुम्हाला नगररचना डिपार्टमेंटला माहित नाही.

**मा. सभापती :-**

मॅडम तुम्ही काय बोलता लक्षात आले नाही.

**दिप्ती भट :-**

शहरामध्ये काय करायचे आणि काय नाही करायचे त्याचे प्लानिंग आहे की नाही. तुम्ही डायरेक्ट खोदता करता आणि पैसे दिल्यानंतर एक सदस्य दुसऱ्या पार्टीचा असेल आणि त्या सदस्याला तिकडे काम करायचे असेल तर तुम्ही तिकडे नकार देता. तुम्ही कामच करत नाही तो नगरसेवक पब्लीककडे व्होटींग करुन आलेला नाही का? माझा क्वेशन मार्क आहे मी नगरसेवक आहे की नाही. मी बाहेर बोर्ड घेऊन बसणार आहे. तीन नगरसेवकमध्ये मी एक आहे. सात नगरसेवकमध्ये मी एक नगरसेवक आहे. मी कुठेही काम करायला जाते तर नगरसेवक येतात. तू इथे एरियामध्ये यायचे नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

ते पर्सनल आहे.

**दिप्ती भट :-**

पर्सनल नाही. हा मॅसेज प्रभागमध्ये देतात. आमच्या गेल्यावर्षीचा प्रभाग निधी का दिला नाही. दरवर्षी प्रभागमध्ये पैसे देता मग आम्हाला पण द्या ना. माझा गेल्या वर्षीचा प्रभाग निधी अजून बाकी आहे. मग ह्या वर्षी तुम्ही मला देणार का? जर तुम्ही असे पैसे पास करता मग प्रभाग अधिकारी सदस्याना पैसे देत नाही. मग नगरसेवकांनी बोलावे की बोलू नये.

**मा. सभापती :-**

मॅडम तुम्ही शांत रहा. मी काय बोलतो.................

**दिप्ती भट :-**

इथे नाही बोलायचे तिथे नाही बोलायचे मग रिझाइन देऊन महासभेच्या बाहेर बोर्ड घेऊन बसणार आहे.

**मा. सभापती :-**

आप क्या बोल रही हो मुझे समझ नही आ रहा है।

**दिप्ती भट :-**

आप जो पैसा ट्रान्सफर कर रहे हो तो हम लोग को कुछ काम देने का रहेगा। स्टॅन्डींग मेंबर बजेट में हमारा जो अधिकार है वही हमको नही मिल रहा है। आप वापस वो ट्रान्सफर कर रहे हो मैं वो बात नही बोल रही हूँ। अच्छी बात है आप ट्रान्सफर करो।

**मा. सभापती :-**

आपके प्रभाग में कर रहे है।

**दिप्ती भट :-**

हमारे प्रभाग में कर रहे है लेकिन हमारा लेटर जाता है। हमको काम करना है तो निधी नही मिलता है।

**मा. सभापती :-**

आपके प्रभाग में ट्रान्सफर करेगे तो आपके प्रभाग में ही काम होगा।

**दिप्ती भट :-**

साहेब निधी नही मिल रहा है।

**मा. सभापती :-**

प्रभाग निधी आपको मिलेगा।

**दिप्ती भट :-**

नही मिला।

**मा. सभापती :-**

क्यों नही मिलेगी बजेट में जो तरतूद किया है प्रभाग निधी और नगरसेवक निधी की वो मिलेगी।

**दिप्ती भट :-**

एक साल से नही मिली।

**मा. सभापती :-**

मैं इस साल की बात कर रहा हूँ। इस साल तो मिलेगा।

**दिप्ती भट :-**

गए साल का क्या करु। मेरा लॉस हुआ है उसका क्या करु? मैं पालिका की सदस्य नही हूँ क्या? मैं नगरसेवक नही हूँ क्या मैं कही आवाज नही उठाने का क्या? आप बोलेगे विषय बढाओ विषय बढ जाता है। हम लोगो को किधर नही बोलने का क्या। आप मेरी जगह रहते तो क्या करते। आप बोलो आपके पास अगर पब्लीक आती थी आपके पास पब्लीक लेटर देती है सोसायटी के लोग, इंजिनिअर ऑफिसर लोग....

**मा. सभापती :-**

कौनसा काम नही हुआ मुझे बताइए वो काम करवा देंगे।

**दिप्ती भट :-**

मैं ३ साल से गिता जैन जब महापौर थी तब महासभा में मैंने पास करवाया था। नगरोत्थान का नाला पास होने के बाद एक कच्चा नाला टाकी के वजह से झगडा हुआ उधर टाकी बनाया कच्चा नाला हर साल खोदते है। हर साल बनाते उसकी वजह से हर साल पानी भर जाता है।

**मा. सभापती :-**

आप प्रभाग निधी दे दिजीए।

**दिप्ती भट :-**

दुसरे भी जरुरी काम है। जो गटर तूट गए है मेरे कुछ काम नही होते है। मैं जाती हूँ तो वहाँ पे क्वेशन मार्क आता है। पैसा नही है बजेट खत्म हो गया तो सारा बजेट कहाँ जाता है। प्रभाग निधी नही देते कुछ काम देते हो तो आप नही करते तो हम कहाँ जाने का।

**मा. सभापती :-**

आपको इस साल की प्रभाग निधी भी मिल रही है और नगरसेवक निधी भी मिल रही है।

**दिप्ती भट :-**

आप दोनो गॅरेन्टी दे रहे हो गए साल का देंगे।

**मा. सभापती :-**

गए साल की बात कहाँ से आ गयी।

**दिप्ती भट :-**

तो नही दिया उसका क्या करोगे?

**मा. सभापती :-**

मॅडम मेरा मतलब थोडी घर का पैसा है। महानगरपालिका का पैसा महापालिका के विकास कार्य के लिए खर्च होता है।

**दिप्ती भट :-**

अभी आप क्या बोले।

**मा. सभापती :-**

मेरा और आपका थोडी होता है। आप क्या बोल रहे हो आपके समझ में आ रहा है। मेरा मेरा कर रहे हो।

(सभागृहात गोंधळ)

**मा. सभापती :-**

जो निधी की तरतूद की गयी है वह प्रभाग में वो निधी खर्च होगी।

**दिप्ती भट :-**

प्रभाग में खर्च होगी लेकिन नगरसेवक लेटर देता है। प्रभाग निधी तो उसका अधिकार है।

**धृवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब मॅडम सिनियर है। इतने साल से महापालिका के सदस्य है, प्रभाग समिती में जो भी नगरसेवक होते है उनका प्रस्ताव प्रभाग अधिकारी को देते है। फिर प्रभाग अधिकारी इंजिनिअर डिपार्टमेंट से सारे प्रस्ताव तयार करते है और प्रस्ताव तयार होने के बाद प्रभाग समिती के मिटींग में वो प्रस्ताव रखते है और मेजोरिटीसे जो डिसीजन होता है वो डिसीजन के हिसाब से काम निकलते है। उसमें समझो किसीने काम लेट दिया था किसीने काम जल्दी दिया तो उसका जल्दी सॅक्शन होता है। किसीने काम लेट दिया तो नही होता है और बजेट पुरा होने के बाद वो नही होता है। तो उनकी जो डिमांड है की प्रभाग समिती की जो निधी होता है वो हर एक के इन्डीव्ह्यूज्वल नही होता है। वो पुरे प्रभाग के अधिकारी और प्रभाग समिती को जो कमिटी है वह कमिटी डिसाईड करती है की कहाँ कहाँ उसको यूज करना है। वो मिटींग में पास होता है। ऐसा नही की आपको पाच लाख रुपये दिया।

**दिप्ती भट :-**

बजेटमध्ये पास करतात त्याला काय म्हणतात १५ लाख निधी १० लाख निधी.

**धृवकिशोर पाटील :-**

नगरसेवकांचे जे निधी असतात ते निधी ॲज पर बजेटच्या हिशोबाने कॅल्क्यूलेशन करुन प्रत्येक नगरसेवकाचा तो खर्च करुन टाकतो. बाकी प्रभाग निधी जो आहे ते प्रभाग समितीमध्ये सदस्य जो निर्णय घेतील त्या प्रमाणे तो खर्च होतो असा नियम आहे.

**दिप्ती भट :-**

आयुक्त साहेबांनी मला डिसीजन द्यावा की बजेटमध्ये जे १५ लाख आणि १० लाख निधी बोलतात ते धृवकिशोर पाटीलने जे बोलतात ते योग्य आहे का? सगळ्यात पहिले पत्र माझे असते पत्रव्यवहारमध्ये मी कधीच चूकत नाही. माझी पत्र वारंवार येतात.

**मा. सभापती :-**

मॅडम आज ३५ विषय पेंडींग आहेत.

**राजीव मेहरा :-**

प्रभाग समिती में कॉप्टेड जो सदस्य गए है उनके लिए आपने १० लाख का प्रोव्हिजन किया है और इलेक्टेड सदस्य है उनको भी १० लाख रुपये है। कॉप्टेड सदस्य को १० लाख देने का आपने फायनल किया है वो उनसे लॉस्ट में बैठते है। वो प्रोव्हिजन है क्या?

**मा. सभापती :-**

महासभा को कौनसा फंड कहाँ पे यूज करना है वो महासभा में है।

**राजीव मेहरा :-**

यह सब्जेक्ट महासभा में आया नही और बजेट में भी नही आया।

**जुबेर इनामदार :-**

प्रभाग समिती अंजर्गत एक ठराविक रक्कम वेगवेगळ्या समितीना दिली आहे. स्विकृत सदस्यांना निधी देता येतो का?

**मा. सभापती :-**

कॉपच्या सदस्यांना पण आपण निधी देतो.

**जुबेर इनामदार :-**

ठाणे महापालिका आणि मुंबई महापालिकामध्ये तसे कुठेही नाही आहे.

**मा. सभापती :-**

मिरा भाईंदरमध्ये जेवढे स्विकृत सदस्य आहेत.............

**राजीव मेहरा :-**

पहले हम नही देते थे। पहली बार हुआ है।

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

महापालिकेच्या स्विकृत सदस्यांना त्यांची नगरसेवक निधी आहे, प्रभाग निधी नाही.

**श्रीप्रकाश सिंह :-**

स्विकृत नगरसेवक पुरा मिरा भाईंदर का है उनका वॉर्ड नही है।

**जुबेर इनामदार :-**

प्रभाग क्र. ६ के अंदर कुछ स्विकृत सदस्य गए और वह स्विकृत सदस्य को निधी दिया है।

**धृवकिशोर पाटील :-**

ऐसा किसी को निधी नही दिया है। किसी आपको भी नही दिया किसी हमको भी नही दिया। वो जो स्विकृत सदस्य बनता है वो सामाजिक भावना से वो रेकमंड करता है की इस रस्ते पे यह गटर बनाओ यहाँ पे पेव्हर ब्लॉक लगाओ यहाँ ढक्कन तुटे है वो लगाओ तो वो प्रभाग अधिकारी उसके सजेशन लेता है और बांधकाम डिपार्टमेंट को देता है। या कन्सन जो डिपार्टमेंटने उसकी मांग की वो उसको देता है।

**राजीव मेहरा :-**

नही यह जो १० लाख की प्रोव्हिजन की गयी है।

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

महाराष्ट्र महानगरपालिका ॲक्ट बोलता है की जितने प्रभाग समिती के सदस्य है.....

**धृवकिशोर पाटील :-**

मैंने जो प्रोसेस बताया वही प्रोसेस है।

**जुबेर इनामदार :-**

महानगरपालिका प्रभाग समिती के जो सदस्य है उनको सन्मान वाटप प्रभाग निधी का होगा। यह नियम है और वो ॲक्ट का नियम है। काम का नही तुम प्रभाग के सदस्य हो उस प्रभाग का काम सुचित करेगा। लेकिन वो सन्मान वाटप वो ॲक्ट का नियम है वो तुम्हाला थंबरुल है। स्विकृत सदस्य को जो तुमने निधी दिया है वो कहाँ से दिया वो हमको जानकारी दिजीए।

**दिप्ती भट :-**

ऐसा नही है की मैं अलग नगरसेवक हूँ इसलिए मेरे को नही दिया।

**राजीव मेहरा :-**

यह जो कल हुआ।

**मा. सभापती :-**

कहाँ हुआ है?

**राजीव मेहरा :-**

प्रभाग ६ में।

**मा. सभापती :-**

क्या हुआ?

**राजीव मेहरा :-**

उन्होंने १० लाख का काम दिया वो काम पास हुआ है। आप सजेशन दे सकते हो हम लोग काम देते है जहाँ जहाँ पे जरुरत है वो चीजे होती नही।

**मा. सभापती :-**

आपका नही हुआ।

**राजीव मेहरा :-**

नही हुआ लास्ट इयर का मेरा काम अभी शुरु भी नही हुआ।

**मा. सभापती :-**

आप फिर लास्ट इयर में जा रहे है।

**राजीव मेहरा :-**

सभापती साहब टेंडर पास हुआ है।

**मा. सभापती :-**

लास्ट इयर की निधी लॅब्स हुई तो।

**राजीव मेहरा :-**

लॅब्स नही हुई वो टेंडर आपने पास किया है।

**दिप्ती भट :-**

कमिशनरने वादा किया है।

**श्रीप्रकाश सिंह :-**

टेंडर पास हुआ तो काम क्यों नही हुआ।

(सभागृहात गोंधळ)

**राजीव मेहरा :-**

सुनवाई नही होती तो कहाँ जाए मैंने कमिशनर साहब से बात की की मेरी प्रभाग निधी और नगरसेवक निधी आर.जी. में यूज करनी है। बोले कौनसी आर.जी मैंने बताया यह आर.जी. वो बोले यह प्रायव्हेट आर.जी है। इसमें नही करने का क्या प्रायव्हेट आर.जी. में कोई सदस्य इस वक्त काम नही कर रहा है? गर्व्हमेंट का फंड यूज नही हो रहा है। हमको बोला गया की नही कर सकते।

**निला सोंस :-**

मा. सभापती महोदय मैं यह कहना चाहती हूँ की यह प्रभाग ६,३,४ की बात होगी लेकिन इस मिटींग में इसका कुछ निष्कर्ष नही निकल सकता। अपनी बात सही जगह पे बोलना जरुरी होता है। मुझे नही लगता इस विषय का निष्कर्ष निकलेगा।

**जुबेर इनामदार :-**

यह वैधानिक समिती है। फायनल है यही पे निकलेगा।

**राजीव मेहरा :-**

आप के लिए रुल अलग हमारे लिए रुल अलग...............

**निला सोंस :-**

जुबेरजी विषय अजेंडा में नही है। आप बहुत ही अनुभवी व्यक्ती है। विषय अजेंडा में नही है, चर्चा घंटो कर सकते है। विषय अजेंडा में नही उसका निष्कर्ष नही निकलेगा।

**राजीव मेहरा :-**

मॅडम जिनके पास राईटस नही उनको निधी दे रहे हो जब की ॲक्ट में प्रोव्हिजन नही है।

**निला सोंस :-**

राजीवजी आप इस विषय पे बात किजीए।

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

धृवजी माझ्यापेक्षा जास्त अनुभवी आहेत.

**मा. सभापती :-**

आज खांबित साहब भी नही है। चार दिन के बाद फिरसे स्टॅडिंग मिटींग लगेगी। पूरी जानकारी के साथ इस विषय पे निर्णय दे देंगे।

**दिप्ती भट :-**

हमको मिल सकता है क्या....

**मा. सभापती :-**

नेक्स्ट मिटींग में डिसीजन लेंगे।

**राजीव मेहरा :-**

आप ब्युटिफिकेशन के लिए खर्चा कर रहे हो एक ही गटर एक साल में.........

**दिप्ती भट :-**

मैं दिखाती हूँ कितने साल में बनाया। मेरा नगरसेवक निधी नगरसेवक के फोनसे रोका गया और वही नगरसेवकने पब्लिकने जो काम रोका था वो काम पब्लिकने मना किया। फिर भी वो काम करके दिया और मेरे नगरसेवक के कहने से वो काम बंद किया और मेरे आठ साल के बाद किया और आपने दो हिसाब तोडके वो काम कर दिया तो आपकी नगररचना क्या करती?

**राजीव मेहरा :-**

एक गटर साल में दो बार बनाना कौनसा लॉजिक दिखाता है। सेम विथ, सेम डेप्थ और जहाँ गरज है वहाँ आपके पास ४० मीटर गटर बनाने का पैसा नही है। किलो मीटर के हिसाब से आप गटर एक ही साल में रिडेव्हलप करते हो।

**मा. सभापती :-**

अगली मिटींग मे इसके बारे में चर्चा करेंगे।

**राजीव मेहरा :-**

हमारे काम नही होते।

**मा. सभापती :-**

आप बोलेंगे तो विषय ले लेंगे।

**राजीव मेहरा :-**

यह टॉपीक पे प्रशासन को जवाब देने दो।

**दिप्ती भट :-**

आम्हाला निधी भेटू शकते की नाही १० लाख भेटू शकतात की पाच लाख.

**राजीव मेहरा :-**

इंजिनियर काम करते है। हम लोग काम देते है मैंने मेरे वॉर्ड में जहाँ पे काम किया मैंने पहले इंजिनिअर से सजेशन मांगी है की, यह प्रॉब्लेम सॉल्व्ह होगी की नही लेकिन जो प्रॉब्लेम है वो बोलने के बाद २ साल में वो काम नही होता है और जहाँ पे आपको काम करना है वहाँ पे हमको प्रभाग निधी और हमारी नगरसेवक निधी लगानी पडती है।

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सन्मा. सभापती महोदय, सन्मा. सदस्यांची जी मागणी आहे त्यांचा मागच्या वर्षीचे नगरसेवक निधी त्यांना मिळणार की नाही.

**राजीव मेहरा :-**

साहेब वो बात नही है।

**दिप्ती भट :-**

आम्हाला निधी किती भेटू शकतो ते सांगा. आम्हाला निधी भेटणार नसेल तर तसे आता बोला. त्याच्यावर पण तोड काढेन. ह्या सभेमध्ये पास केले आहे तुम्ही बोला. तुम्ही विचार करुन बोला.

**राजीव मेहरा :-**

मेरा क्वेशन है यह है की एक ही चीज दो बार एक साल में बनती है और जहाँ पे काम हुआ नही वो सजेशन देने के बाद आप हमको जवाब देते हो की तरतूद नही है। एक जगह पे काम करने के लिए आपके पास तरतूद नही है। दुसरी जगह पे एक जगह दो बार आप काम कर रहे हो वो इंजिनिअर को मालूम नही है की आप लोग आज ही सोचते हो आज सोचा और कल काम चालू हो गया।

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सन्मा. सभापती महोदय सन्मा. सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो विषय आज अजेंड्यावर नाही. प्रशासनाने जे काही अजेंड्यावर आले आहे त्याच्या अनुषंगाने प्रशासनाने व्यवस्थित भुमिका मांडलेली असते. परंतु अचानक मुद्दा उपस्थित केल्यावर तुम्ही करणार की नाही करणार हे आयुक्त साहेबांची बाब आहे तर माझी सदस्यांना विनंती राहील की आपण आयुक्त साहेबांबरोबर ह्या संदर्भातल्या काही शंका असतील त्याची तिथे चर्चा इथे करु.

(सभागृहात गोंधळ)

**दिप्ती भट :-**

बजेट में बैठते है तो उनको मालूम होना चाहिए।

**राजीव मेहरा :-**

प्रभाग समिती के सदस्य को जो प्रोव्हिजन की गई है उसपे आप क्लेरिफिकेशन दिजीए।

**मा. सभापती :-**

पुढचा विषय घ्या.

**राजीव मेहरा :-**

प्रभाग समिती के सदस्य को १०-१० लाख निधी दी गयी। उसका क्या?

**जुबेर इनामदार :-**

पुढची समिती सभा आपण आयोजित करणार असाल तर ह्या विषयावर सविस्तर उत्तर आणा. वैधानिक समिती असे बोलून जमणार नाही. अशा समितीमध्ये तुम्हाला प्रकारच्या चर्चा करता येणार नाही.

**मा. सभापती :-**

तुम्ही पत्र द्या त्याचा खुलासा देतो.

प्रकरण क्र. ५४ :-

**विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे तसेच पुर्न:विनियोजन पत्रकास मान्यता देणे.**

ठराव क्र. ४८ :-

**मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सन 2019-20 या वर्षाच्या मंजुर अर्थसंकल्पात विशेष निधी या लेखाशिर्षातंर्गत खालील तरतुदी करण्यात आलेल्या आहेत**

| | | |
|---|---|---|
| 1) | पाणी पुरवठा व मलनि:सारण समिती | रु.1.00 कोटी |
| 2) | विधी व नियोजन समिती | रु.1.00 कोटी |
| 3) | शिक्षण व समाज कल्याण व झोपडपट्टी सुधार, क्रिडा व सांस्कृतिक समिती | रु.1.00 कोटी |
| 4) | आरोग्य परिक्षण, वैद्यकीय सहाय्य, उद्यान व शहर सुशोभिकरण समिती | रु.1.00 कोटी |

**मिरा-भाईंदर शहरात विविध प्रभागात विविध विकासाची कामे मोठ्या स्वरुपात करावयाची असल्याने तसेच शहरात शासनाच्या विशेष निधी अंतर्गत सुरु असलेल्या कामासांठी मनपा निधी कमी पडत असल्याने वरील समितीचा 4.00 कोटीचा निधी हा प्रभागाच्या विकास कामांसाठी पुर्नविनियोजन करुन वर्ग करणे व प्र भागातील कामांचे अंदाजपत्रक करुन त्यास मान्यता घेणेबाबत मा.महापौर यांच्याकडे चर्चा करण्यात आली. त्या अनुशंगाने खालील प्रमाणे प्रस्ताव तयार करण्यात आलेले आहेत.**

| | | |
|---|---|---|
| 1) | भाईंदर (प.) मुर्धा ते उत्तन या प्रभाग समिती क्र.01 अंतर्गत विविध कामे करणे | रु.50,00,000/- |
| 2) | भाईंदर (प.) प्रभाग समिती क्र.02 अंतर्गत विविध कामे करणे | रु.50,00,000/- |
| 3) | मिरारोड (पुर्व) प्रभाग समिती क्र.05 अंतर्गत विविध विकासाची कामे करणे. | रु.50,00,000/- |
| 4) | मिरारोड (पुर्व) व रा.म.क्र.08 वरील प्रभाग समिती क्र.06 अंतर्गत विविध विकासाची कामे करणे. | रु.50,00,000/- |
| 5) | उत्तन येथे काका बॅप्टीस्टा चौक विकसीत करणे (भाग-२) | रु.35,00,000/- |

**उपरोक्त कामांसाठी खालीलप्रमाणे पुर्नविनियोजन प्रस्ताव विहीत नमुन्यात सादर करण्यात येत आहे**

महाराष्ट्र लेखा सहीता 1971 नमुना क्र.10 नियम 30 (3)

| या शिर्षातुन | | | | | | ह्या शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 1 | **सार्व. बांधकामे (पृ.क्र.39)** | **महानगरपालिका मार्फत होर्डींग, कॅन्टीलिवर उभारणे/ रिक्षा स्टॅण्ड** | **300.00 लक्ष** | **-** | **300.00 लक्ष** | **सार्व. बांधकामे (पृ.क्र.39)**<br><br>**सार्व. बांधकामे (पृ.क्र.39)** | **नविन रस्ते/ डी.पी. रोड बांधकाम**<br><br>**मूलभूत सुविधा ब) मनपा हिस्सा** | **2000.00 लक्ष**<br><br>**500.00 लक्ष** | **रु.2000.00**<br><br>**500.00 लक्ष** | **200.00 लक्ष**<br><br>**50.00 लक्ष** | **"महानगरपालिका मार्फत होर्डींग, कॅन्टीलिवर उभारणे / रिक्षा स्टॅण्ड"** या लेखाशिर्षात रु.300.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली **31** मार्च **2020** पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातुन **"नविन रस्ते / डी.पी. रोड बांधकाम"** या लेखाशिर्षाखाली रु.**200.00** लक्ष, **"मूलभूत सुविधा ब) मनपा हिस्सा "** या लेखाशिर्षाखाली रु.50.**00** लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| 2 | **विशेष निधी (पृ.क्र.32)** | **पाणी पुरवठा व मलनि:सारण समिती** | **100.00 लक्ष** | **-** | **100.00 लक्ष** | **सार्व. बांधकामे (पृ.क्र.39)** | **मूलभूत सुविधा ब) मनपा** | **500.00 लक्ष** | **500.00 लक्ष** | **95.00 लक्ष** | **"पाणी पुरवठा व मलनि :सारण समिती"** या लेखाशिर्षात रु.100.00 लक्ष एवढी तरतुद |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | **हिस्सा** | | | | असून सदर लेखाशिर्षाखाली **31** मार्च **2020** पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातुन **“मूलभूत सुविधा ब) मनपा हिस्सा”** या लेखाशिर्षाखाली रु.**95.00** लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| **3** | **विशेष निधी (पृ.क्र.32)** | **विधी व नियोजन समिती** | **100.00 लक्ष** | **-** | **100.00 लक्ष** | **सार्व. बांधकामे (पृ.क्र.39)** | **मूलभूत सुविधा ब) मनपा हिस्सा** | **500.00 लक्ष** | **500.00 लक्ष** | **95.00 लक्ष** | **‘विधी व नियोजन समिती’** या लेखाशिर्षात रु.100.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली **31** मार्च **2020** पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातुन **“मूलभूत सुविधा ब) मनपा हिस्सा ”** या लेखाशिर्षाखाली रु.**95.00** लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| **4** | **विशेष निधी (पृ.क्र.32)** | **शिक्षण व समाज कल्याण व झोपडपट्टी सुधार, क्रिडा व सांस्कृतिक समिती** | **100.00 लक्ष** | **-** | **100.00 लक्ष** | **सार्व. बांधकामे (पृ.क्र.39)** | **मूलभूत सुविधा ब) मनपा हिस्सा** | **500.00 लक्ष** | **500.00 लक्ष** | **95.00 लक्ष** | **‘शिक्षण व समाज कल्याण व झोपडपट्टी सुधार , क्रिडा व सांस्कृतिक समिती ”** या लेखाशिर्षात रु.100.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली **31** मार्च **2020** पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातुन **“मूलभूत सुविधा** |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | **ब) मनपा हिस्सा "** या लेखाशिर्षाखाली रु.**95.00** लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| **5** | **विशेष निधी (पृ.क्र.32)** | **आरोग्य परिक्षण, वैद्यकीय सहाय्य, उद्यान व शहर सुशोभिकरण समिती** | **100.00 लक्ष** | **-** | **100.00 लक्ष** | **सार्व. बांधकामे (पृ.क्र.39)** | **मूलभूत सुविधा ब) मनपा हिस्सा** | **500.00 लक्ष** | **500.00 लक्ष** | **95.00 लक्ष** | **"आरोग्य परिक्षण , वैद्यकीय सहाय्य, उद्यान व शहर सुशोभिकरण समिती "** या लेखाशिर्षात रु.100.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली **31** मार्च **2020** पर्यंत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातुन **"मूलभूत सुविधा ब) मनपा हिस्सा "** या लेखाशिर्षाखाली रु.**95.00** लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे. |

**तरी वरील विकास कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय आर्थिक मान्यता व पुर्नविनियोजन पत्र्कास मान्यता देण्यात येत आहे.**

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. राकेश शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५५, **Work Bank GEF assisted ESCBS Project अंतर्गत Unutilized Grant मधून ITS साठी Schedule Management System Software खरेदी करणेस व त्यासाठी M/S Amnex Infotechnologies Pvt. Ltd. यांचे निविदेतील दर स्विकारणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**राकेश शहा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी **World Bank GEF assisted ESCBS** प्रकल्पांतर्गत **ITS** अंमलबजावणी करीता अनुदान मंजुर आहे. सदर प्रकल्पांतर्गत **ITS** अंमलबजावणीसाठी सल्लागार म्हणुन Delhi Integrated Multi-Modal Transit System (DIMTS) यांची नेमणुक केलेली आहे.

**ITS** अंमलबजावणीकरीता **System Integrator** नियुक्त करणेसाठी सल्लागार **DIMTS** यांनी **RFP** तयार केले होते. त्यानुसार **Selection of System Integrator for ITS** कामी **26/03/2018** रोजीचे निविदा सुचनेनुसार **e-tendering website** https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर **RFP** प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरकामी **M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांची प्राप्त निविदा उघडुन **Financial Evaluation** सल्लागार यांनी केले होते.

**M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांनी **RFP** मधील **Scope** नुसार एकुण **capex cost** रु. **9,92,57,394/-** व **opex cost** रु.**4,91,98,258/-** अशी एकुण रु.**14,84,55,652/-** (सर्व करासह) रक्कमेची निविदा सादर केली होती. सदर निविदेचे **RFP** मधील **Scope** मध्ये **Schedule Management System Software** चा समावेश असुन त्याकरीता **M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांनी रु.**1,70,28,887/-** इतका दर सादर केलेला आहे.

परंतु सदरकामी **ESCBS** प्रकल्पांतर्गत **ITS** साठी उपलब्ध तरतूदीमधून काम पुर्ण करण्याच्या दृष्टीने दि.**25/09/2018** व दि.**26/09/2018** रोजी निविदाधारक, **ITS** सल्लागार व महानगरपालिकेची निविदा समिती यांच्या संयुक्त बैठकीमध्ये **Scope** कमी करणेबाबत चर्चा करून निर्णय घेण्यात आला. त्यानुसार **Scope** मधून **Schedule Management System Software** वगळून निविदा अंतिम करण्यात आली. **M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांनी **Scope** मधून **Schedule Management System Software** वगळल्यानंतर **capex cost** रु.**8,22,28,507/-** व **opex cost** रु.**4,38,81,223/-** एकुण रु. **12,61,09,730/-** (सर्व करासह) दर सादर केले होते.

**M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांनी **Scope Reduction** केल्यानंतर सादर केलेल्या दरानुसार निविदा स्विकारणेसाठी मा. विशेष स्थायी समिती सभा ठराव क्र. **92** दि.**29/10/2018** अन्वये मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार **ITS** अंमलबजावणीची कार्यवाही सुरु आहे.

सद्यस्थितीत **ITS** कामी **ESCBS** प्रकल्पांतर्गत **Unutilized Grant** मधुन अतिरिक्त अनुदान उपलब्ध होऊ शकत असल्याबाबत **Project Management Unit, ESCBS Ministry of Housing and Urban Affairs, Delhi** यांचेकडून कळविले आहे.

**Schedule Management System Software** हे बस संचलनासाठी उपयुक्त आहे. सदर **Software** साठी निविदेमध्ये दर प्राप्त आहेत. याबाबत महानगरपालिकेचे सल्लागार **DIMTS** यांचे अभिप्राय घेतले असता, **RFP** मधील अटीशर्ती नुसार कामामध्ये **20%** कमी-जास्त करण्याची मुभा असुन सदर **Software** चे निविदेतील किंमत (रु.**1,70,28,887/-**) **M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांचे समवेत केलेल्या कराराच्या रक्कमेच्या (रु.**12,61,09,730/-**) **20%** च्या मर्यादेत असल्याचे अभिप्राय दिले आहेत. तसेच **PMU, ESCBS Ministry of Housing and Urban Affairs, Delhi** यांनी देखील **RFP** नुसार **20%** कमी-जास्त करण्याची तरतूद असल्याचे अभिप्राय दिले आहेत.

सदरकामी मनपाचे **ITS** सल्लागार **DIMTS** यांनी **Schedule Management System Software** संबधी **M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांचे निविदेतील दराबाबत **Financial evaluation Report** दिला असुन सदर याबाबत **Similar Scope** असलेल्या बाजारातील किंमतीशी तुलना

करुन **M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांचे निविदेतील दर वाजवी असल्याचे अभिप्राय दिले आहेत. तसेच **M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांनी निविदेतील सादर केलेल्या दराने आज देखील सदरचे **Software** पुरवठा करण्याची तयारी दर्शविली असुन दि.**18/07/2019** रोजी संमती पत्र सादर केलेले आहे.

**ITS** कामी **System Integrator** नियुक्त करण्यासाठी निविदा मागविताना **RFP** मधील **Scope** मध्ये **Schedule Management System Software** चा समावेश असून त्याकरीता **M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांनी निविदेमध्ये रु.**1,70,28,887/-** इतके दर सादर केलेले आहेत. तसेच सदरकामाचे निविदा अटीशर्ती **RFP** मधील **ITB Clause 33.1** नुसार **20%** पर्यंत काम वाढविण्याची मुभा आहे व सदर वाढीव कामासाठी **World Bank GEF assisted ESCBS** अंतर्गत अतिरिक्त अनुदान प्राप्त होणार आहे.

तरी**, ITS** कामी **System Integrator** चे **Scope** मधुन वगळलेले **Schedule Management System Software** खरेदी करणे**,** त्यासाठी **M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांचे निविदेतील दर रु.**1,70,28,887/-** स्विकारणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे**,** असा ठराव मांडत आहे.

**श्रीप्रकाश सिंह :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**राजीव मेहरा :-**

इ.एस.सी.बी.एस. इसका पुरा मतलब क्या आपने हर जगह पे इ.एस.सी.बी.एस, आय.टी.एस, डी.आय.एम.टी.एस, आर.आय.डी. का मतलब रिक्वेस्ट ऑफ प्रपोजल है, रिक्वेस्ट ऑफ प्रायजिंग है।

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

हे हॅब्रीब्रेशन आहे. ई.एस.सी.बी.एस. ते आहे इफिशियन्ट ॲन्ड सस्टेनेबल सिटी बस सर्विसेस ह्यांच्या संदर्भात वर्ल्ड बँकेने काही शहरांना सेंट्रल गर्व्हमेंटच्या माध्यमातून मदत करण्याचे ठरवले होते. त्याच्यामध्ये भारत भरातले चार शहर आहेत त्यात महाराष्ट्रातले मिरा भाईंदर हे एक शहर आहे. त्याच्यामध्ये आपल्या सीटी बसच्या सर्विसेस इफिशियन्ट करण्यासाठी त्यांनी आय.टी.एस इन्टीलीजन्ट ट्रान्सपोर्ट सिस्टम त्यांनी आपल्याला मदत केली आहे. मागच्या वर्षी आपण आय.टी.एस च्या संदर्भातले जेवढे काही कम्पोनंट आपण विचारात घेतले होते त्याची निविदा काढली होती. त्यांनी जे दिलेली ग्रॅन्ट होते त्याच्यामध्ये आलेल्या कॉस्टमध्ये हे सगळे काम आपले ॲडजस्ट होऊ शकले नव्हते. त्यामुळे आलेल्या निविदेमधून एक काम पूर्ण बाजूला काढून मागच्या वर्षी स्टॅन्डिंग समोर प्रस्ताव ठेवला होता आणि तो मंजूर करुन जवळ जवळ आपले काम अंतिम टप्यामध्ये आहे. चालू वर्षामध्ये वर्ल्ड बँकेच्या माध्यमातून सेंट्रल गर्व्हमेंटनी आपल्याला सांगितले की तुमचा जो मागच्या वर्षीचा कम्पोनंट तुम्ही मागे ठेवला होता ते तुम्ही कम्पलीट करा. आम्ही तुम्हाला ह्या वर्षाच्या माध्यमातून पैसे द्यायला तयार आहोत. मागच्या वर्षी आपण त्याची निविदा मंजूर केली होती. परंतु त्यांच्याशी ॲग्रीमेंट करु शकले नाही. त्यावेळेस निधी कमी होता. त्यांना आपण विचारले की ह्या दरामध्ये द्यायला तयार आहेत का? त्यांनी ती तयारी दर्शविलेली आहे म्हणून आपण त्याच निविदेमधून बाजूला काढून ठेवलेला कम्पोनट आता स्टॅन्डिंग कमिटी समोर आणलेला आहे.

**राजीव मेहरा :-**

यह रिटनेबल लोन है।

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

लोन नही यह १०० टक्के ग्रॅन्ट है।

**राजीव मेहरा :-**

१०० टक्के ग्रन्ट है डेली इंटीग्रेटेड मल्टी मॉडल ट्रान्सेस सिस्टम हमारे पास ऑन द रोड ३५ बस है।

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

अब ४० हो गया।

**राजीव मेहरा :-**

दिल्ली इन्टीग्रेड मल्टी मॉडल ट्रान्सीस सिस्टम है। यहाँ पे पहली बार यह चीज यूज हुई। दिल्ली में २०१७ में ४२०० बस थी।

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

वो कन्सल्टंट है।

**राजीव मेहरा :-**

आप जो खर्चा कर रहे हो करीब करीब १२ करोड, ६१ लाख कितनी बस के लिए ४० बस।

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

बस के उपर वो खर्चा नही है। कंट्रोल रुम है ना............

**राजीव मेहरा :-**

कॅपेक्स में क्या आ रहा है आपने कॅपेक्स का दिया है।

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

एक कंट्रोल रुम है। बस स्टॉप है। उसके उपर पी.आय.एस बोर्डस है। पब्लिक इन्फॉमेशन सिस्टीम जो है वो बोर्डस बस स्टॉप पे लगेगे की आनेवाली बस उसको इंटीग्रेड रहेगी। जी.पी.एस द्वारा की आनेवाली बस कितने समय में आ रही है।

**राजीव मेहरा :-**

दिल्ली में ५००० बसेस है। ५००० बसेस के लिए उनको इतना खर्चा हुआ है। जितना आप ४० बस के लिए खर्चा कर रहे हो। हमको ग्रॅन्ट मिला है लेकिन ४० बस के लिए कॅपेक्स कॉस्ट ९ करोड है। ऑपरेटींग कॉस्ट हर साल का ४ करोड है क्या?

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

नही ५ साल का है।

**राजीव मेहरा :-**

१ करोड आपका हर साल ५० बस पे इन्फोंमेशन देने के लिए जी.पी.एस तो हर बस में है। मॉनेटरींग करने के लिए जी.पी.एस है लेकिन यह सिस्टम है जिसमें से कुछ चिजे आपने निकाल दी है।

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सिर्फ एक सॉफ्टवेअर था शेड्यूल्ड मॅनेजमेंट सॉफ्टवेअर या उसमें स्टाफ की ड्यूटी असाइन करने का साफ्टवेअर था तो वो हमने बाजू में निकाला था की उसकी कॉस्टींग मिलनेवाली ग्रॅन्ट से मॅच नही कर रही थी। चालू साल में सेंट्रल गर्व्हमेंट बोला की आपको हम पैसे देने के लिए तयार है। आप वो लगा लो। इसलिए लास्ट इयर जो टेंडर निकाला था उसका ही कम्पोनट बाजू में रखा था अभी स्टॅन्डिंग कमिटी के सामने लाया।

**राजीव मेहरा :-**

सर में वही बोल रहा हूँ की २९..........

**मा. सभापती :-**

आप लोगो ने बोलना चाहिए था की नही लगाना चाहिए।

**राजीव मेहरा :-**

नही लगाना नही। मैं आप से पूछ रहा हूँ की इतना पैसा खर्चा........

(सभागृहात गोंधळ)

**राजीव मेहरा :-**

इससे अच्छा पहले आप बसेस तो बनाइए।

**मा. सभापती :-**

गर्व्हमेंट हमें ग्रॅन्ट दे रही है। पुरी सिस्टम आपके शहर के लिए उपयोगी है, परिवहन सेवा के लिए। टिकीटींग के लिए हमारा इम्प्रुव्हमेंट होगा। ज्यादा लोग आऐंगे, परिवहन सेवा अच्छी होगी। हमको ग्रॅन्ट मिल रहा है तो क्यों यूज नही कर रहे हो।

**राजीव मेहरा :-**

ग्रॅन्ट मिल रहा है लेकिन ४० बस के लिए में कमिशनर साहब से पूछता हूँ १२ करोड रुपया ४० बस। हम बस तो ला नही रहे है। हमारे बसेस जो है उसे............

**मा. सभापती :-**

२७ बस और आनेवाली है।

**जुबेर इनामदार :-**

किती बसेससाठी आपल्याला उपयोगी पडेल.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मा. सभापती महोदय, ट्रान्सपोर्ट आपल्याकडे चालू केले होते तेव्हा ५८ बस आपल्या ताब्यात होत्या. मागच्या कॉन्ट्रॅक्टरने काही कारणामुळे करारनामा इम्पलीमेन्ट न होऊ शकल्यामुळे मध्येच तो संपलेला आहे आणि आपण आपल्या कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने स्टाफ नेमून काम चालू ठेवलेले आहे. आपल्याकडे स्वतःचे गॅरेज, मेकॅनीक अशी यंत्रणा पहिल्यापासून कधी डेव्हलप झाली नव्हती. कारण की आपण कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने करत होतो. ह्याच्यामध्ये आपल्या लेव्हलला सुपरव्हिजन पूर्णपणे होऊ शकत नाही म्हणून आपण निर्णय घेतला की परत कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने चालवायला देऊ या. दरम्यानच्या काळामध्ये आपल्या ऑन रोड बसेसची संख्या २५-३० च्या दरम्यान चालत होती. मागच्या महिन्यापासून आपण कॉन्ट्रॅक्टर अपॉईट केलेला आहे. आपण बसेस चालू करुन त्यांच्या ताब्यात द्यायच्या आहेत. तर आजमितीला ४० च्या आसपास ऑन रोड चालवतो. अजून आपल्याकडे १८ बसेस आहेत. त्या दुरुस्त करुन कॉन्ट्रॅक्टरला हॅन्ड ओव्हर करणार आहोत. टोटल ५८ बसेस कॉन्ट्रॅक्टरकडे देतो. जे.एन.एन.यु.आर.एम योजनेमध्ये आपण आणखी २७ बस खरेदी केल्या आहेत. त्याला ३-४ वर्षापूर्वी खरेदी केल्या होत्या. परंतु त्याचे पजेशन घेतलेले नव्हते. त्या बसेस आता आपण आर.टी.ओ ला चौकशी केली त्याच्या रजिस्ट्रेशनचे बी.एस.पोर्ट च्या ज्या आहेत रजिस्ट्रेशन करुन देणार का त्यावेळेस त्या आपल्या नावाने डेपोमधून निघालेल्या असल्याने ते रजिस्ट्रेशन करायला काही अडचण येणार नाही हे सांगितलेले आहे. आपण टाटा मोर्टस कळवलेले आहे. ज्या बसेस आम्ही खरेदी केल्या आहेत त्या तुम्ही चांगल्या कंडीशनमध्ये द्या. त्यावेळेस तुम्ही खरेदी केल्या चार वर्षापूर्वीचे टायर्स आणि बॅटरी आहेत त्या आता आम्हाला वापरता येणे शक्य नाही. त्या रिप्लेस करुन आमच्या ताब्यात द्या. जेणेकरुन त्याचे रजिस्ट्रेशन करुन चालू करु. ५८+२७ अशा ८५ बस आपल्या ताब्यामध्ये राहणार आहेत. त्या ८५ बसेसला जी.पी.एस सिस्टम असेल बस स्टॉपला पी.आय.एस सिस्टम असेल ह्या सगळ्या बसचे कंट्रोल आपल्या कंट्रोल रुममध्ये घोडबंदर रोडला जो डेपो तयार केला आहे त्याठिकाणी व्हिडीयो वॉल तयार झाली आहे. कंट्रोल सिस्टम तयार झाली आहे. ह्या सगळ्या इंटिलिजन्ट ट्रान्सपोर्ट आपण ज्याला म्हणू त्या भले १० बस असो, १०० बस असो, १००० बस असो. सॉफ्टवेअर सॉफ्टवेअर आहे. त्याला ते इम्पलीमेंन्ट करावेच लागणार. असे नाही की कमी बस आहेत म्हणून आपल्याला ते करायचे नाही. आता सेंट्रेल गर्व्हमेंटनी मिरा भाईंदर एक चांगल करु शकते ह्या उद्देशानी आपल्याला त्यांनी मदत केलेली आहे आणि आपल्या ८५ बस रोडवर असतील हेच त्यांनी अभिप्रेत आहे. त्याच्यापेक्षा आपली गरज जास्त असेल तर भविष्यामध्ये खरेदी केली तर वाढवू शकतो आणि ही सिस्टीम त्या बसेसला इम्पलीमेन्ट करुन ह्या सॉफ्टवेअरवर रन करु शकतो.

**दिप्ती भट :-**

बस स्टॉप नविन बनवणार की तेच ठेवणार.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

आहे तेच बस स्टॉप राहतील.

**दिप्ती भट :-**

एका वर्षात बस स्टॉप बनवता आणि एका वर्षात सर्व बस स्टॉप तोडून टाकले.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

आपल्या रस्ता रुंदीकरणाचा भाग असेल तर भाग वेगळा.

**दिप्ती भट :-**

आपल्या नगररचना डिपार्टमेंट प्लानिंग बरोबर आपल्या बरोबर बसते का? १० वर्षाचे प्लानिंग आहे. १० वर्षानंतर हे बनवणार आहे इथे ही वस्तू आहे. तुम्ही नगरसेवकांनी पैसे टाकायचे ते ५ महिन्यामध्ये तोडायचे आणि कुठल्यातरी नागरिकांनी किंवा नगरसेवकांनी पैसे मागितले की तुम्ही सांगणार पैसे नाहीत. बजेट संपले आहे. एका वर्षामध्ये सर्व तुटले तुम्ही कुठे जी.पी.एस. सिस्टम लावणार आहेत. त्याच्यावर नेते लोकांचेच फोटो लावता. तुम्ही तुमचे काही वापरता का? की पालिकेची हेड करा ते काही करतच नाही. शहरामध्ये बस स्टॉपची हालत बघा. ६ महिन्या अगोदर बनवलेले बस स्टॉप तुटून गेले. नगररचनेला हर एक गोष्टीमध्ये इन्व्हॉल्व करा. त्यांना विचारा हर एक डिपार्टमेंट तुमच्याबरोबर बसलेले नसते. सगळ्या डिपार्टमेंटला पत्र द्यायचे आणि सगळीकडे फिरत रहायचे. एक महिन्यानंतर तुमचे उत्तर येणार नाही. उत्तर

आल्यानंतर पॅनल्टीचा विषय आहे ना तुम्हाला शरम यायला पाहिजे की आयुक्तांनी तुम्हाला पॅनल्टी लावली आणि तुम्ही तो विषय टाकला.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सन्मा. सभापती महोदय सदस्यांनी कुठल्या विषयाबद्दल सांगितले त्याचा बोध होत नाही.

**दिप्ती भट :-**

बस स्टॉपची काय हालत आहे ते तुम्ही जाऊन बघा. सगळे निघाले आहेत. एका बस स्टॉपचा ठिकाणा नाही सगळे पैसे वाया गेले.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मा. सभापती महोदय आपल्या अजेंड्यावरचा विषय आहे इन्टीलिजन्ट ट्रान्सपोर्ट सिस्टमला आपण सॉफ्टवेअर खरेदी करण्या संदर्भातला तो विषय आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

तुम्ही तुमचे सजेशन साहेबांना द्या. साहेब ट्रान्सपोर्ट डिपार्टमेंटचे पण इन्चार्ज आहेत. असे बस स्टॉप खराब आहेत. बस स्टॉप रिपेयरींग केले पाहिजे. तुम्ही सजेशन द्या. भाईंदरमध्ये शेकडो बस स्टॉप आहेत तुम्ही पर्टीक्युलर २-४ बस डेपोचे नाव घ्या. जे खराब आहेत ते रिपेयरींग करतील.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

रिपेअरींग करता येईल कारण कुठलीच वस्तू अशी परमनन्ट नसते काही एरियामध्ये प्रॉब्लेम असतो.

**राजीव मेहरा :-**

एक बस स्टॉप सोसायटी के अंदर बनाया है।

**प्रकरण क्र. ५५ :-**

**Work Bank GEF assisted ESCBS Project अंतर्गत Unutilized Grant मधून ITS साठी Schedule Management System Software खरेदी करणेस व त्यासाठी M/S Amnex Infotechnologies Pvt. Ltd. यांचे निविदेतील दर स्विकारणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ४९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी **World Bank GEF assisted ESCBS** प्रकल्पांतर्गत **ITS** अंमलबजावणी करीता अनुदान मंजुर आहे. सदर प्रकल्पांतर्गत **ITS** अंमलबजावणीसाठी सल्लागार म्हणुन Delhi Integrated Multi-Modal Transit System (DIMTS) यांची नेमणुक केलेली आहे.

**ITS** अंमलबजावणीकरीता **System Integrator** नियुक्त करणेसाठी सल्लागार **DIMTS** यांनी **RFP** तयार केले होते. त्यानुसार **Selection of System Integrator for ITS** कामी **26/03/2018** रोजीचे निविदा सुचनेनुसार **e-tendering website** https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर **RFP** प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरकामी **M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांची प्राप्त निविदा उघडुन **Financial Evaluation** सल्लागार यांनी केले होते.

**M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांनी **RFP** मधील **Scope** नुसार एकुण **capex cost** रु. **9,92,57,394/-** व **opex cost** रु.**4,91,98,258/-** अशी एकुण रु.**14,84,55,652/-** (सर्व करासह) रक्कमेची निविदा सादर केली होती. सदर निविदेचे **RFP** मधील **Scope** मध्ये **Schedule Management System Software** चा समावेश असुन त्याकरीता **M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांनी रु.**1,70,28,887/-** इतका दर सादर केलेला आहे.

परंतु सदरकामी **ESCBS** प्रकल्पांतर्गत **ITS** साठी उपलब्ध तरतूदीमधून काम पुर्ण करण्याच्या दृष्टीने दि.**25/09/2018** व दि.**26/09/2018** रोजी निविदाधारक, **ITS** सल्लागार व महानगरपालिकेची निविदा समिती यांच्या संयुक्त बैठकीमध्ये **Scope** कमी करणेबाबत चर्चा करून निर्णय घेण्यात आला. त्यानुसार **Scope** मधून **Schedule Management System Software** वगळून निविदा अंतिम करण्यात आली. **M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांनी **Scope** मधून **Schedule Management System Software** वगळल्यानंतर **capex cost** रु.**8,22,28,507/-** व **opex cost** रु.**4,38,81,223/-** एकुण रु. **12,61,09,730/-** (सर्व करासह) दर सादर केले होते.

**M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांनी **Scope Reduction** केल्यानंतर सादर केलेल्या दरानुसार निविदा स्विकारणेसाठी मा. विशेष स्थायी समिती सभा ठराव क्र. **92** दि.**29/10/2018** अन्वये मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार **ITS** अंमलबजावणीची कार्यवाही सुरु आहे.

सद्यस्थितीत **ITS** कामी **ESCBS** प्रकल्पांतर्गत **Unutilized Grant** मधुन अतिरिक्त अनुदान उपलब्ध होऊ शकत असल्याबाबत **Project Management Unit, ESCBS Ministry of Housing and Urban Affairs, Delhi** यांचेकडून कळविले आहे.

**Schedule Management System Software** हे बस संचलनासाठी उपयुक्त आहे. सदर **Software** साठी निविदेमध्ये दर प्राप्त आहेत. याबाबत महानगरपालिकेचे सल्लागार **DIMTS** यांचे अभिप्राय घेतले असता, **RFP** मधील अटीशर्ती नुसार कामामध्ये **20%** कमी-जास्त करण्याची मुभा असुन सदर **Software** चे निविदेतील किंमत (रु.**1,70,28,887/-**) **M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांचे समवेत केलेल्या कराराच्या रक्कमेच्या (रु.**12,61,09,730/-**) **20%** च्या मर्यादेत असल्याचे अभिप्राय दिले आहेत. तसेच **PMU, ESCBS Ministry of Housing and Urban Affairs, Delhi** यांनी देखील **RFP** नुसार **20%** कमी-जास्त करण्याची तरतूद असल्याचे अभिप्राय दिले आहेत.

सदरकामी मनपाचे **ITS** सल्लागार **DIMTS** यांनी **Schedule Management System Software** संबधी **M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांचे निविदेतील दराबाबत **Financial evaluation Report** दिला असुन सदर याबाबत **Similar Scope** असलेल्या बाजारातील किंमतीशी तुलना करुन **M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांचे निविदेतील दर वाजवी असल्याचे अभिप्राय दिले आहेत. तसेच **M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांनी निविदेतील सादर केलेल्या दराने आज देखील सदरचे **Software** पुरवठा करण्याची तयारी दर्शविली असुन दि.**18/07/2019** रोजी संमती पत्र सादर केलेले आहे.

**ITS** कामी **System Integrator** नियुक्त करण्यासाठी निविदा मागविताना **RFP** मधील **Scope** मध्ये **Schedule Management System Software** चा समावेश असून त्याकरीता **M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांनी निविदेमध्ये रु.**1,70,28,887/-** इतके दर सादर केलेले आहेत. तसेच सदरकामाचे निविदा अटीशर्ती **RFP** मधील **ITB Clause 33.1** नुसार **20%** पर्यंत काम वाढविण्याची मुभा आहे व सदर वाढीव कामासाठी **World Bank GEF assisted ESCBS** अंतर्गत अतिरिक्त अनुदान प्राप्त होणार आहे.

तरी, **ITS** कामी **System Integrator** चे **Scope** मधुन वगळलेले **Schedule Management System Software** खरेदी करणे, त्यासाठी **M/s. Amnex Infotechnologies Pvt. Ltd** यांचे निविदेतील दर रु.**1,70,28,887/-** स्विकारणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदन :- श्री. श्रीप्रकाश सिंग**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५६, **महानगरपालिका क्षेत्रातील मुर्धा ते उत्तन या विभागातील बाजार फी लिलावाकरीता E-Auction आलेल्या बोली लिलाव रक्कमेस मंजूरी मिळणेबाबत.**

**धृवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब हा जो मुर्धा ते उत्तन बाजार वसुली करिता जो विषय आलेला आहे. ९.१.२०१९ ला सदर कॉन्ट्रॅक्टरची मुदत संपली होती. ते प्रशासनाचे काम होते की ज्यावेळी निविदा संपते त्याच्या अगोदर

ही निविदा काढून त्याची मंजूरी घ्यायला लागते. परंतु तसे झालेले नाही. तसेच महापालिकेला सजेशन दिले होते की संपूर्ण मिरा भाईंदर क्षेत्रासाठी बाजार वसुलीचे एकच सेंटर करा. जेणेकरुन सोयीचे होईल. एक टेंडर अगोदर संपते. एक नंतर संपते त्यामुळे गैरसोय होते कामात सूसूत्रपणा येत नाही. ही निविदा पण ऑन लाईन आहे. तसेच गजानन एन्टरप्रायजेस हे जे वसूलीचे ठेकेदार आहेत. ह्याच्या बऱ्याच कम्पलेंट आल्या आहेत. हा व्यक्ती तिथे फेरिवाले वाढवतो. महापालिका जेव्हा कारवाई करायला जाते त्यावेळी तो कारवाईला जाणूनबुजून अडथळा निर्माण करतो. आपण ठरवून दिलेल्या पैशापेक्षा हा व्यक्ती जास्त पैसे घेतो अशा बऱ्याच तक्रारी आलेल्या आहेत. ९ जानेवारीला संपलेली आहे. इलेक्शनची आचार संहिता १० मार्चला डिक्लेर झाली आहे. म्हणजे जवळ जवळ २ महिने भेटलेले आहे आणि त्या दोन महिन्यांमध्ये कारवाई न करता हे झाले आहे. आमची आपणास विनंती आहे की ह्या ठेकेदाराला हे काम न देता आता आपण मिरा भाईंदरची जी ऑनलाईन निविदा काढली आहे तर त्या लोकांना सेम अमाऊंटमध्ये करीत असतील तर द्या किंवा ह्याच्यापेक्षा जास्त अमाऊंटमध्ये करीत असतील तर द्या. ह्या तक्रारीमध्ये काय तथ्य आहे ते तपासून बघा. ९ जानेवारीला मुदत संपलेली आहे.

**वर्षा भानुशाली :-**

मा. सभापती साहेब ही मुदत संपलेली आहे आणि एवढ्या टायमानंतर हा विषय आला ते कोणाच्या चूकीमुळे. प्रत्येक वेळेला असेच असते आपण मुदतवाढ देत राहतो आणि ते स्वतःची मनमानी करुन वसुली करतात. तुम्ही मुर्ध्याच्या रोडला काही नॉनव्हेजची दुकान आहेत त्याला काय लावून काहीतरी करायचे असते ते रोडवर ओपनच आहेत. तिथे पण मनमानी फी वसूल करतात. बिल्डींग खाली ज्यांचा ठेका असतो तोच लॉरी लावतो. आपण विचारले तर डायरेक्ट कॉन्ट्रॅक्टर आहे असे त्याचे आन्सर असते. त्याला आपण पुन्हा मुदतवाढ देतो आपण त्याला पाठींबा द्यायचा आहे का?

**जुबेर इनामदार :-**

साहेब मुदतवाढीचा विषय आहे माझा प्रशासनाला प्रश्न आहे. हा मुदतवाढीचा विषय महापालिका ॲक्टमधील कुठल्या पानावरचा विषय आहे. कोणत्या कलमानुसार आपण त्यांना मुदतवाढ देतो. ठेकेदार नेमायचा, संविधा काढायची त्याला नियम आहे. मुदतवाढ जी आहे ती कोणत्या आधारावर शासनाची अधिसुचना किंवा जी.आर आहे का? असली तर आम्हाला द्या. आम्ही नेहमी मुदतवाढ देत असतो कारण प्रशासनाची चूक आणि हलगर्जीपणा ह्याला आम्ही नेहमी मुदतवाढ देत असतो. कारण पालिकेचे आर्थिक नुकसान होईल. बाजार फी तर वसूल करावीच लागेल. प्रशासन स्वतःच्या अंगावर काहीच घेत नाही. स्थायी समितीनी मंजूरी दिली तर तुम्ही काय कराल ते आम्हाला नियम दाखवा. आमचा ही अभ्यास होऊ द्या. प्रशिक्षणामध्ये हे विषय कधी निघत नाही. समोरची व्यक्ती आम्हाला उत्तर देत नाही. आम्ही विचारले होते नगरभवनमध्ये सुध्दा कार्यक्रम लावला होता. त्याच्यामध्ये मी जे प्रश्न विचारले त्याची उत्तरच नव्हती. प्रशासकीय अधिकारी प्रशासकीय अधिकाऱ्यांनाच वाचवतो. आम्हाला माहिती दिली आणि आमचा अभ्यास झाला तर ते बहुतेक अडचणीचे होईल.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मा. सभापती महोदय एखादी निविदा आपण जेव्हा मागवतो तेव्हा त्या निविदेला मा. आयुक्तांनी स्विकृती दिल्यानंतर त्या निविदा धारकाशी संविधा करण्यासाठी म्हणजे एन्टरींग इन टू कॉन्ट्रॅक्ट स्थायी समितीच्या मंजूरीची आवश्यकता आहे. ती निविदा मागवलेली त्या निविदा धारकाबरोबर आपल्याला जेव्हा ॲग्रीमेंट करायचे आहे, किती कालावधीसाठी करायचे आहे टेंडर कॉस्ट किती असेल हे सर्व मंजूरी प्रदान करणारे स्थायी समिती आहे. एकदा ती मंजूरी झाली की तो जो कालावधी आहे तो स्थायी समितीच्या मंजूरीने मान्य केलेला आहे. त्याच्यामध्ये काही गरज पडते म्हणून सक्षम प्राधिकारी मुळातच ह्या कालावधीसाठी स्थायी समिती असल्यामुळे आपण स्थायी समितीसमोर येतो.

**जुबेर इनामदार :-**

ही झाली कार्यपध्दती. तुम्ही जी माहिती दिली ती कार्यपध्दतीची आहे. स्थायी समितीने आयुक्तांना अधिकार दिले. स्थायी समितीने दिलेला प्रस्ताव ४५ दिवसात मंजूर नाही झाला तर तुम्हाला तो अधिकार आहे. महासभेमध्ये दिलेला प्रस्ताव ९० दिवसाच्या आत निकाली लावला नाही तर आयुक्तांना त्याचा अधिकार आहे. त्यांनी स्वतःच्या स्तरावर निकाली लावावा. निविदा संपायची मुदत आपल्याला माहित असते. त्याच्या आधी ही प्रक्रिया सुरु झाली पाहिजे. कमीत कमी ६ महिन्याआधी सुरुवात केली पाहिजे. ३ महिन्याआधी सुरुवात केली पाहिजे. ती केली जात नाही त्याच्यानंतर हे सगळ आटपल्यावर काहीच शिल्लक राहिले नाही. आम्हालाही पालिकेचे आर्थिक नुकसान करायचे नसते. म्हणून आम्ही त्याच्या मंजुऱ्या देतो. कुठल्या आधारावर

देतो ते तरी आम्हाला दाखवा. कागदावर काहीतरी असेल ना कायदा आहे ना मनमर्जीने काही काम चालू शकत नाही. साध्या सोसायटीचे बायलॉजच्यावरती चालू शकत नाही. बायलॉजच्यावर आपण काहीच करु शकत नाही. महापालिकेचा देखील ॲक्ट आहे. त्याचा वेळोवेळी शासनाने त्याच्यामध्ये सुधारणा केली आहे असे कुठे सुधारणा आहेत का? मी सचिवांना सकाळी विचारले त्याच्या अगोदर येऊन बसले परंतु ते काही सांगु शकले नाही. परंतु आज स्थायी समितीसमोर उघडपणे विचारतो तुम्ही अधिकारी अनुभवी असताना आम्हाला व्यवस्थित उत्तर द्या. ते उत्तर ऑन रेकॉर्ड येऊ द्या. ज्या अधिसुचना आहेत गर्व्हमेंटचे काही निर्णय आहेत का? त्याला शासनाच्या काय अटी आहेत. त्या विषयावर नियम बनवले आहेत का? अशाप्रकारे हा मुदतवाढीचा विषय हा जो आणला होता ह्याच्यानंतर एक वर्षाचा आहे मजूर पुरवठ्याचा २०१८ ला संपले. एक वर्ष उलटून दीड वर्षाचा आहे. समिधा काढणे इमेजिएट काढणे हा नियम आहे. कारण त्याच्यामध्ये तुमची स्पर्धा होते त्याच्यामध्ये महापालिकेचा फायदा होऊ शकतो. १० टक्के पेक्षा वाढू शकत होता. एवढ्या काळामध्ये जे नुकसान झाले आहे त्याची भरपाई कोण करणार?

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मी आताच सांगितले की अधिनियमातल्या स्थायी समितीने समिधा करण्याचा जो स्थायी समितीचा जो परवानगी देण्याचा जो अधिकार आहे त्याच्यामध्ये जो कालावधी अगोदर ठरला होता त्याच्यामध्ये ही कारणासाठी एक्सस्टेंशन होते. म्हणून सक्षम प्राधिकारी मूळ मंजूरी देणारी स्थायी समिती आहे. म्हणून आपण एक्स्टेशन..........

**जुबरे इनामदार :-**

साहेब बरोबर आहे पण हा विषय कोणी गृहित धरला. तुम्ही मी आयुक्तांनी असे कागदावर द्या. शासनाचा ह्या विषयावर निर्णय असेल. मिरा भाईंदर महापालिकेमध्ये जी वस्तू होते असे नाही. ठाण्यामध्ये, मुंबईमध्ये पण होत असेल ह्या महाराष्ट्राच्या सर्व नगरपालिकांमध्ये होत असेल.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मूळ समितीला परवानगी स्थायी समितीने दिली परंतु वाढीव कालावधीसाठी म्हणून स्थायी समितीने..........

**जुबेर इनामदार :-**

किती कालावधी.

**मा. सभापती :-**

मॅक्झीमम ६ महिने.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मा. सभापती महोदय सन्मा. सदस्यांच्या ज्या भावना आहेत मी जॉइन्ट झाल्यापासून मागच्या ३-४ स्थायी समितीमध्ये चर्चा झाली होती. विविध विभागाचा मी आढावा घेतलेला आहे की नेमक कोणाकडे काय काय प्रलंबित आहे. ज्यांच्या मुदती संपत आल्या आहेत. आताच सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे बाजार वसूलीचा जो विषय आहे तो तुम्ही एकत्रित करा. म्हणजे ह्याची लवकर मुदत संपली की उशीरा संपली ते एकत्रित करा. अशा पध्दतीने आपला मॅन पावरच्या संदर्भामध्ये विविध ठेके काढले होते. त्याच्या संदर्भात होत होता. आपण एकच निविदा आता काढलेली आहे. त्याच्यामुळे प्रत्येक दिवशी एक्सटेंशनसाठी वेगवेगळे विषय घेऊन येण्याऐवजी ठराविक कालावधीत २-३ वर्षाचा जो ठेका असेल त्याच्यानंतर तो संपण्यापूर्वी त्याला प्रक्रिया करता येईल. नंबर ऑफ टेंडर हे जे आहेत हे बांधकाम सारखे नाहीत. सर्विस प्रोव्हायर्डस आहेत. तर प्रत्येक डिपार्टमेंटमध्ये इतक्या मोठ्या प्रमाणात संचिका तयार होत असतात. त्याच्यामध्ये काही विभागाकडून त्याच्यामध्ये लॅक्युलर राहिलेला आहे तो स्ट्रिम लाईन करण्याचा प्रयत्न करतो की हे ठराविक कालावधीमध्ये तीन महिने, चार महिन्यानंतर ही प्रक्रिया आपण सुरु केली पाहिजे. जेणेकरुन पूर्ण कालावधी संपण्याअगोदर आपल्याला नविन टेंडर प्राप्त होऊ शकेल. आपण भविष्यामध्ये सर्वच बाबतीमध्ये काळजी घेतो. मोठ्या प्रमाणात मॅनपावरचे एकत्रिकरण केलेले आहे. दुसरा विषय गार्डनचा त्याचे पण आपण निविदा काढलेली आहे. काल आयुक्तांसमोर ते प्रकरण ठेवलेले होते. पुढच्या स्टॅन्डिंगला त्याचा विषय येईल म्हणजे एक्स्टेंशनचा विषय संपून जाईल. त्याच्यामध्ये गार्डन मेन्टेनन्स आहे तो विषय आल्यावर नंतर सांगेन परंतु प्रशासनाचा हा प्रयत्न स्ट्रिम लाईन करण्याचा विषय आहे. काही कारणाने अशी पेन्डेन्सी राहिली असेल तर मूळ मंजूर प्राधिकारी स्थायी समिती असल्यामुळे स्थायी समिती त्याला एक्सस्टेनशनला मुदत द्यावी.

**जुबेर इनामदार :-**

साहेब मंजुरी आम्ही देऊ ना. स्पेअरवाला विषय म्हणजे प्रशासन आहे. कायदा काय आहे. ६ महिने देऊ शकतो नाही देऊ शकतो आयुक्तांच्या मंजुरीने ६ महिने त्या एक्स्टेंशन होऊ शकतो. स्थायी समितीला त्याला ३ मंजूरी देण्याचा अधिकार आहे की नाही हे कुठे आहे. आपण गृहित धरतो का?

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

गृहित धरण्याचा विषय नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

आता हे जे विषय आलेले आहेत ते विषय वर्षानुवर्षे स्थायी समितीपूढे येत राहतात आणि त्याला मंजूरी देत असते. सांगण्याचे तात्पर्य एवढेच आहे की प्रशासनाने थोडेसे वेळीस मुदतीमध्ये टेंडर काढून महापालिकेचा कसा फायदा होईल त्याचा विषय आहे. तेवढी तुम्ही काळजी घ्या.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

नक्की काळजी घेऊ.

**मोहन म्हात्रे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत मुर्धा ते उत्तन या विभागातील बाजार वसुलीचे काम गजानन इंटरप्रायजेस ही कंपनी काम करीत होती. सदर कंपनी जबरदस्तीने फेरीवाल्याकडून जास्त पैसे वसुल करणे तसेच महापालिकेतर्फे अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करतेवेळी अडथळा निर्माण करणे व फेरीवाल्यांच्या संख्येत वाढ करणे इ. प्रकारचे चुकीचे कार्य सदर कंपनीमार्फत होत असल्याचे तक्रारी प्राप्त झालेलया आहेत.

महापालिकेने प्रशासनाच्या सोयीकरीता संपूर्ण मिरा भाईंदर शहरातील बाजार वसुली करीता एकच निविदा काढलेली असून त्याच निविदा धारकास मुर्धा ते उत्तन परिसरातील बाजार वसुलीचे काम गजानन इंटरप्राईज या कंपनीने दिलेल्या दरानुसार देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे. तसेच मगील ठेकेदाराला नविन निविदा मंजूर होईपर्यंत निविदेतील मंजूर दरामध्ये १० टक्के नैसर्गिक वाढ करुन बाजार फी वसुलीचे काम सुरु ठेवण्याकरीता ही सभा मंजूरी देत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ५६ :-**

**महानगरपालिका क्षेत्रातील मुर्धा ते उत्तन या विभागातील बाजार फी लिलावाकरीता E-Auction आलेल्या बोली लिलाव रक्कमेस मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ५० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत मुर्धा ते उत्तन या विभागातील बाजार वसुलीचे काम गजानन इंटरप्रायजेस ही कंपनी काम करीत होती. सदर कंपनी जबरदस्तीने फेरीवाल्याकडून जास्त पैसे वसुल करणे तसेच महापालिकेतर्फे अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करतेवेळी अडथळा निर्माण करणे व फेरीवाल्यांच्या संख्येत वाढ करणे इ. प्रकारचे चुकीचे कार्य सदर कंपनीमार्फत होत असल्याचे तक्रारी प्राप्त झालेलया आहेत.

महापालिकेने प्रशासनाच्या सोयीकरीता संपूर्ण मिरा भाईंदर शहरातील बाजार वसुली करीता एकच निविदा काढलेली असून त्याच निविदा धारकास मुर्धा ते उत्तन परिसरातील बाजार वसुलीचे काम गजानन इंटरप्राईज या कंपनीने दिलेल्या दरानुसार देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे. तसेच मगील ठेकेदाराला नविन निविदा मंजूर होईपर्यंत निविदेतील मंजूर दरामध्ये १० टक्के नैसर्गिक वाढ करुन बाजार फी वसुलीचे काम सुरु ठेवण्याकरीता ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. मोहन म्हात्रे अनुमोदन :- श्रीम. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५७, **बांधकाम व निषकासन कचऱ्याचे (डेब्रिज) संकलन, वाहतुक, पुर्नचक्रीकरण करणे कामाच्या दरांना मान्यता देणेबाबत.**

**जुबेर इनामदार :-**

ह्या विषयाची माहिती द्या.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापतींच्या परवानगीने गोषवाऱ्यामध्ये सविस्तर माहिती स्वयंस्पष्ट दिलेली आहे तरी सन्मा. सदस्यांना ॲडीशनल माहिती सादर करतो. केंद्र शासनाने २९.३.२०१६ ला अधिसुचना जारी केलेली आहे आणि बांधकाम निष्कासन कचरा व्यवस्थापन नियम २०१६ लागू केलेले आहेत. स्वच्छ भारत अभियानमध्ये ह्या गोष्टीचा अंतर्भाव आहे आणि ह्याच्यासाठी आपल्या शहरात मोठ्या प्रमाणात डेब्रीज वगैरे निघतात. फ्लॅटचे इंटिरियरचे काम करतात. ते रस्त्यावर टाकतात. त्यामध्ये सुसूत्रता येण्यासाठी शासनाने दिलेल्या गाईडलाईननुसार ठाणे महापालिकेने हा प्रकल्प उभा केलेला आहे. त्या धर्तीवर त्यांनी आपल्याला पत्र पाठवेल. आजूबाजूच्या महापालिकेचा त्याच्यात समावेश होऊ शकतात. त्याप्रमाणे आपण मा. महासभेची मान्यता घेऊन ठाणे महापालिकेला कळवले. आम्ही त्याच्यात सहभागी होऊ शकता. तद्नंतर ठेकेदारानी महापालिकेला रेट कळवले आणि रेटला मंजूरी देण्याचा विषय मा. स्थायी समितीपूढे आलेला आहे. ठाणे महापालिकेमध्ये तो प्रकल्प सध्या चालू आहे.

**जुबेर इनामदार :-**

डेब्रीज उचलून कुठे घेऊन जातात.

**शिवाजी बारकुंड :-**

त्याच्यात दोन प्रकार आहेत गोषवाऱ्यात आपण स्पष्ट उल्लेख केलेला आहे. ज्यांनी कचरा निर्माण केला तो जर घेऊन गेला तर त्याच्यासाठी वेगळे रेट आहेत. त्यांनी जर विनंती केली मी घेऊन जाणार नाही. तुम्ही घेऊन जा. ठाणे महापालिकेचा जो प्रकल्प आहे तिथे घेऊन जायचे. मिरा भाईंदरमध्ये नाही तिथे त्याच्यावर प्रक्रिया होऊन वेगवेगळे रिसायकल प्रोडक्ट ते तयार करतात.

**जुबेर इनामदार :-**

ज्या लोकांनी रस्त्यावर कचरा टाकला आहे. त्या लोकांनीच त्याची विल्हेवाट लावली पाहिजे ते लावत नाही. अशा कचऱ्याचे पालिका काय करणार?

**शिवाजी बारकुंड :-**

त्याच्यात तुम्ही जो बोलता तो पण कचरा आला.

**जुबेर इनामदार :-**

तो उचलणार कोण? त्याच्यात वाहतूक कोण करणार?

**शिवाजी बारकुंड :-**

ह्याच्यामध्ये समजा मी माझ्या फ्लॅटचे काम केले आणि मी कचरा टाकला मी जर स्वतः नेऊन कचरा दिला तो एक पार्ट झाला पण त्यांनी जर नाही केले तर आपले संबंधीत त्या भागातले एस.आय असतात त्यांना माहित असते मग ते त्यांना नोटिस देणार आपण तो कचरा उचलणार त्याचे रेट आहेत. ते पैसे त्याच्याकडून वसूल करणार.

**धृवकिशोर पाटील :-**

विषय चांगला आहे. पण जे रेट दिले आहेत ते खूप जास्त आहेत. ह्या रेटमध्ये समोरचा माणूस जो कचरा निर्माण करणारा आहे त्या माणसाला हे फिजीबल होणार नाही. तुम्ही जे सांगितले आपला जे सॅनिटरी इन्स्पेक्टर असतो तो आयडेन्टीफाय करेल. परंतु एकही एस.आय किंवा मुकादम ते आयडेन्टीफाय करु शकत नाही. कारण लोक फ्लॅटमध्ये इंटिरियरचे कामासाठी लाखो रुपये खर्च करतात आणि कचरा खाली आणून ठेवतात. आणि त्याच्यावर दुसरा माणूस ठेवतो, तिसरा ठेवतो आणि तो ढीग वाढत जातो. कोणाचे ही लक्ष नसते. अशा वेळी तो आयडेन्टीफाय करणे इट्स व्हेरी डिफीकल्ट आणि मग काय होईल महापालिका तो कचरा त्या माणसाला उचलायला सांगेल आणि ह्याचा भुर्दंड महापालिकेवर होईल. ह्याचबरोबर आपल्या बांधकाम विभागाचे किंवा पाणी पुरवठा जे काही कॉन्ट्रॅक्टर असतात ते स्वतः रॅबीट उचलून घेऊन जातात परंतु ही जर सिस्टम लागू केली तर ते जे लोक आहेत ते लोक असेच टाकतील आणि तो पून्हा अन आयडेन्टीफाय कचरा किंवा डेब्रीज आपल्याला उचलायला लागेल. पुन्हा लोकप्रतिनिधी तुम्हाला प्रेशर करतील

की तिकडे कचरा किंवा डॅब्रीज पडला आहे तो उचलून घ्या. उद्या काही प्रोग्राम आले किंवा कार्यक्रम आहेत १५ ऑगस्ट, २६ जानेवारी किवा महापालिकेचे काही उपक्रम असतात त्यावेळी तो कचरा उचलणे क्रमप्राप्त आहे. महापालिकांमध्ये अशी सिस्टम आहे आपण वर्षाला दोन करोड खर्च करतो की जे डॅब्रीज उचलून आपण घेऊन जाणार मग हा खर्च बंद होईल का?

**शिवाजी बारकुंड :-**

हा कचरा उचलण्याचा जो खर्च आहे तो बंद होणार. दुसरा मुद्दा म्हणजे महापालिकेचे जे ठेकेदार असतील पाणी पुरवठा विभाग किंवा बांधकाम विभाग असू द्या त्यांचा ह्यांच्याशी काही संबंध नाही. त्याची जी जबाबदारी आहे त्यांनी त्याची विल्हेवाट लावायची. तिसरा महत्वाचा मुद्दा तुम्ही बोलता डेब्रीज तयार होणार उचलणार. आजच्या घडीला कुठल्याही जागेत ते डेब्रीज सी.आर.झेड मध्ये टाकतात तक्रारी होतात. हे सायंटीफिक पध्दतीने केलेले आहे. आणि इथे नेणे गरजेचे आहे. स्वच्छ भारत अभियानामध्ये करणे अभिप्रेत आहे. प्रशासनाच्या वतीने स्थायी समितीला विनंती आहे हा प्रस्ताव आपण मंजूर करावा.

**जुबेर इनामदार :-**

विषय अतिशय चांगला आहे. आमच्या समोर जे प्रश्न निर्माण होतात तुम्ही स्वतः बोलतात अनआयडेन्टीफाय जागेवर ते कचरा सोडून जातात. आपल्याकडे उघडे प्लॉट अजून पडलेले आहेत. त्याच्यावर नेऊन टाकतात. त्याच्यातले डेब्रीज उचलणार ते पैसे कोण भरणार. पालिका तुम्ही कोणावर टेंडर करणार?

**शिवाजी बारकुंड :-**

तुम्ही लक्षात घ्या जो कचरा निर्माण करेल संबंधित त्या भागातले एस.आय. आहेत ते एस.आय. एक्स.वाय.झेड फ्लॅट नं. १० मध्ये हे काम चाललेले आहे त्याला जाऊन नोटिस देणार त्याच्याकडून हे करणार.

**जुबेर इनामदार :-**

साहेब आजपर्यंत हा विषय होऊ शकला नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

हे संबंधीत प्रोजेक्टकडे जाणार.........

**जुबेर इनामदार :-**

आमचे धोरण निश्चित नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

पानपट्टे साहेब बारकुंड साहेब असे बोलले की एस.आय. आहेत त्यांनी तो कचरा आयडेन्टीफाय करुन संबंधीतांना नोटिस द्यायची आणि त्याच्याकडून वसूल करायचे इट्स पॉसिबल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो घनकचरा अधिनियमानुसार आम्ही सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटचा कचरा उचलतो. आता स्वच्छ भारत अभियानमध्ये कचरा उचलणे कम्पलसरी आहे. त्याला ५० मार्क्स आहेत. विषय चांगला आहे. त्याला सायंटीफिक प्रोसेस पण आहे आणि त्यानुसार जर अनवॉटेंड अन आयडेन्टीफाय डेब्रीज टाकले कोणीच कंट्रोल राहत नाही. त्या ठिकाणी महापालिकेला बजेट ठेवावे लागणार आहे. अनआयडेन्टीफाय काही पडले तर त्याला प्रोसेसिंग महापालिका करणार. हायवेला रात्री बेरात्री कचरा टाकतात....

**अनिता पाटील :-**

स्लम एरियामध्ये डेब्रीजचा एवढा मोठा इश्यू होतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्यामुळे एस.आय. वगैरे काही शक्य नाही.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

बफींग कारखानेवाले............

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

बफींग नाही.

**जुबेर इनामदार :-**

प्लॉटमध्ये टाकतात तो तुमच्या स्वच्छ भारत अभियानामध्ये येत नाही का? ते उघडच पडले आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

अनधिकृत डेब्रीजसाठी महापालिकेसाठी काही तरतूद लागणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

ह्याचा अर्थ पालिकेला त्याचा भुर्दंड भरायचा आहे.

**धृवकिशारे पाटील :-**

तुमच्या बोलण्यामध्ये आणि पानपट्टे साहेबांच्या बोलण्यामध्ये परस्पर विसंगती आहे. आमचा फक्त एकच मुद्दा होता. एस.आय., मुकादम आणि सुपरव्हायझर ५० टक्के आयडेन्टीफाय करु शकत नाही. ५० टक्के आयडेन्टीफाय करु शकतात. ५० टक्के करु शकत नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

का आयडेन्टीफाय करु शकत नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

आम्ही सर्व नगरसेवक वॉर्डामध्ये पायी फिरतो. मी माझ्या ६ नंबर प्रभागामध्ये बोलतो महापालिकेचा एक मुकादम आहे त्याचे नाव मंगेश बाकी कॉन्ट्रॅक्टरचे ३ मुकादम आहेत. तीन माणसांना एवढ्या मोठ्या प्रभागामध्ये नजर ठेवण, सुपरव्हायझींग करणे इट्स व्हेरी डिफीकल्ट. ते स्वतः आयडेन्टीफाय करतात की साहेब आम्हाला माहित नाही की कोणी टाकले. २४ तास राहूच शकत नाही. पब्लीकची टेडेंसी अशी आहे घरात लाख रुपये खर्च करणार पण डेब्रीज उचलण्याकरिता ५००-१००० रुपये खर्च करणार नाही. ते लोक रात्री येऊन बिल्डींगच्या तिकडे टाकून जातात आणि कोणाचेही लक्ष नसते. तुमची संकल्पना चांगली आहे. त्याबद्दल आमचे दुमत नाही. परंतु महापालिकेला एस्क्ट्रा भुर्दंड पडू नये अशी आमची इच्छा आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

महापालिकेला भुर्दंड नाही आणि आम्ही एका दिवसात कोणाचेही इंटेरियरचे काम होत नाही. आपण प्रॅक्टीकल लोक आहेत. फिरतो आणि कळते ह्या बिल्डींगमध्ये इथे काम चालू आहे.

**जुबेर इनामदार :-**

बारकुंड साहेब त्यांना रस्त्यावरचा कचरा दिसत नाही ते घरामध्ये इंटेरियर कुठे बघायला जाणार आहेत. काहीतरी बोलता. प्रॅक्टीकली काय प्रॉब्लेम आहे ते बघा.

**शिवाजी बारकुंड :-**

हा विषय अतिशय चांगला आहे स्वच्छ भारत अभियानामध्ये.

**जुबेर इनामदार :-**

स्वच्छ भारत अभियानाचे...............

(सभागृहात गोंधळ)

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आता आपण दोन कोटी खर्च करता ना.

**अनिता पाटील :-**

तुमचे म्हणणे अगदी बरोबर आहे. इंटेरियर एक दिवसात होत नाही. आयडेन्टीफाय होईल पण ८० टक्के होईल. स्लम एरियात घराला घर लागून असते १० लोकांनी एकत्र काम दिले असेल तर कोणाचे तुम्ही आयडेन्टीफाय करणार एका दिवसात बांधकाम करुन मोकळे होतात.

**शिवाजी बारकुंड :-**

प्रशासनाने विषय दिलेला आहे. विषय चांगला आहे. परत एकदा विनंती करतो. शेवटी मा. स्थायी समिती सभागृह आहे. आपण विषय मंजूर करा अशी आमची विनंती आहे. शेवटी निर्णय आपण घ्यायचा आहे.

(सभागृहात गोंधळ)

**दिप्ती भट :-**

पानपट्टे साहेब गेल्या १० वर्षापासून मी माझ्या वॉर्डमध्ये तुम्ही नोटिस दिली की नाही दिली पण आम्ही नोटिस दिली कचरा उचलून टाका म्हणून पण ह्याच्यामध्ये कधी कधी आम्हाला प्रेशर येते पण तुम्ही हे जे करणार आहे त्याची सर्व सोसायटींना नोटिस पाठवा. तुम्ही सोसायटीला कळवा की तुम्हाला आमच्या लोकांबरोबर कॉन्ट्रॅक्ट करायचे आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

त्याला आपण हेल्पलाईन ठेवणार.

(सभागृहात गोंधळ)

**दिप्ती भट :-**

मिरारोडमध्ये प्रभाग क्र. ५ मध्ये आम्हाला आणखी एक नंबर द्या. त्याची मांग करते बाकी विषय चांगला आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

टोल फ्री क्र आपण करणार आहोत. आपल्या शहरात डेब्रीज टाकायला अजीबात जागा नाही. कचऱ्याला प्रोसेसिंग करायला उत्तनला जागा आहे. आपल्या डेब्रीजला जागा नसल्यामुळे दुसऱ्या शहरामध्ये डेब्रीज नेऊन आपण सायंटिफिकली प्रोसेस करतो. त्यासाठी हे अत्यावश्यक आहे. डेब्रीज टाकायला जागा नाही त्यासाठी आपण विनंती करतो.

**निला सोंस :-**

पानपट्टेजी अच्छा प्रोजेक्ट ला रहे है। शहर साफ होगा बट आय जस्ट वॉन्ट टू नो की जो बात कर रहे है डेब्रीज घरोसे लेकिन आप लोगो का सर्वेक्षण होगा ना आपके पास एव्हरेज होगा। सोसायटी से कितना प्रतिशत डेब्रीज निकलता है जहाँ तक मुझे लगता है प्रायव्हेट जादा है। प्रायव्हेट प्लॉट किसी बिल्डर या खाजगी के हो तो उसपे जादा है। मतलब नागरिको का डेब्रीज उतना नही होगा।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

बहुत कम है। बॉम्बे से जो कन्स्ट्रक्शन चल रहे है............

**निला सोंस :-**

मैं वही बात कर रही हूँ हम नागरिको के सुविधा के लिए बैठे है जो प्रायव्हेट बिल्डर के लिए नियम बना सकते हो।

**राजीव मेहरा :-**

आपका जो एक्झीस्टींग स्टाफ है उनको जो रिस्पॉन्सिबिलीटी दी गई है। वो उनसे ८० टक्के भी नही होती अभी जो ड्यूटी है उसमें वो ८० टक्के नही पहोच पाते। उसमें आप और बोल रहे हो की यह चीज करेंगे। वो भी जैसे घर के अंदर जाके चेक करने जैसा वो कैसे कर पाऐंगे आप प्रॅक्टीकली बताईए।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मॅक्झीमम डेब्रीज बाहर से आता है। हाऊसहोल्ड का डेब्रीज इतना निकलता नही थोडासा मायनर रहता है और आयडेन्टीफाय हो जाता है।

(सभागृहात गोंधळ)

**राजीव मेहरा :-**

आपका जो एक्झिस्टींग स्टाफ है वो अपनी ड्यूटी से ८० टक्के भी कर रहे है क्या? अगर हमको या कॉमन मॅन को एस.आय. को फोन करना पडता है यहाँ पे यह प्रॉब्लेम है यह करके दो वो नही करता है। उसके लिए २-२, ३-३ दिन लग जाते है। उसके बाद में उसपे ॲडीशनल डालोगे तो क्या प्रॉब्लेम होगी। एक्झीस्टिंग काम भी नही होने वाला है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

वो ठेकेदार करनेवाला है उसको हम हेल्प करेंगे।

**राजीव मेहरा :-**

हर चीज ठेकेदार को दोगे।

**मा. सभापती :-**

ठराव पढो उसके बाद चर्चा करो।

**धृवकिशोर पाटील :-**

बांधकाम व निष्कासन कचऱ्याचे (डेब्रिज) संकलन, वाहतूक, पुर्नचक्रीकरण करणे **कामी मिरा भाईंदर महानगरपालिकेने ठाणे महानगरपालिकेने नेमलेले मे. मेट्रो वेस्ट हॅन्डलिंग प्रा.लि. या कंत्राटदारास मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील** डेब्रिज व इ. साहित्य वाहतुक करणे, संकलन करणे व त्यावर प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावणे हे काम ठाणे महानगरपालिकेने मंजुर केलेल्या दराने देणेबाबत गोषवाऱ्यात नमुद केलेले आहे.

बांधकाम व निष्कासन कचऱ्याचे (डेब्रिज) संकलन, वाहतूक, पुर्नचक्रीकरण करणे **कामी मिरा भाईंदर महानगरपालिकेने ठाणे महानगरपालिकेने नेमलेले मे. मेट्रो वेस्ट हॅन्डलिंग प्रा.लि. या कंत्राटदारास**

**मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील** डेब्रिज व इ. साहित्य वाहतुक करणे, संकलन करणे व त्यावर प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावणे हे काम ठाणे महानगरपालिकेने मंजुर केलेल्या दराने देणेबाबत गोषवाऱ्यात नमुद केलेले आहे.

ठाणे महापालिकेच्या **मे. मेट्रो वेस्ट हॅन्डलिंग प्रा .लि. या कंत्राटदारास** फक्त 6 महिन्याकरीता (फेब्रुवारी 2020 पर्यंत) **मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील** डेब्रिज व इ. साहित्य वाहतुक करणे, संकलन करणे व त्यावर प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावण्याकरीता मंजूरी देऊन तसेच महानगरपालिकेच्या कोणत्याही ठेकेदाराची बांधकाम व निष्कासन, कचऱ्याची वाहतुक व विल्हेवाट लावता कामा नये. जी कंपनी/व्यक्ती बांधकाम व निष्कासन, कचऱ्याची निर्मिती करेल वाहतुक व याची विल्हेवाट करण्याकरीता त्याच मालकाकडून सदरहु कंपनी ते शुल्क आकारेल व महानगरपालिकेने सदरहु शुल्क कंपनीस देवू नये. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरण परिवर्तन मंत्रालयाने केलेल्या नियमाप्रमाणे महानगरपालिकेने बांधकाम व निष्कासन कचऱ्याची साठवणूक व त्यावर प्रक्रिया करणे, त्याची विल्हेवाट लावणे त्यासाठी पायाभुत संरचना उभी करुन प्रकल्प कार्यान्वीत करणे हे बंधनकारक आहे. त्यामुळे प्रशासनाने महापालिका क्षेत्रात प्रकल्प उभारणेकरीता कार्यवाही करावी व त्याचा सविस्तर आराखडा मा. महासभेपुढे मंजुरीस्तव शिफारस करावा असा मी ठराव मांडत आहे

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

६ महिन्यामध्ये मिरा भाईंदरमध्ये हा प्रकल्प कसा सुरु करु शकतो.

**जुबेर इनामदार :-**

६ महिने तुम्ही काय करणार.

**धृवकिशोर पाटील :-**

आपण ह्याच कंपनीला प्रायोरिटी बेसीसवर फक्त ६ महिन्यांकरिता देत आहोत. ह्याच्यामध्ये आपण असे म्हटले आहे महापालिकेने कोणतेही पैसे ह्या ठेकेदारास देऊ नये. जो कचऱ्याची निर्मिती करेल व्यक्ती किंवा कंपनी त्याच कंपनीने पैसे द्यायचे. महापालिका कोणतेही पैसे देणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे रस्त्यावर जो डेब्रीज पडलेला आहे त्याची वाहतुक कोण करणार?

**धृवकिशोर पाटील :-**

तोच करणार जसे बारकुंड साहेबांनी सांगितले रॅबीट पडलेले आहे तो एस.आय. मुकादम सुपरव्हायझर कोणीही व्यक्ती असेल तो आयडेन्टीफाय करेल आणि त्या व्यक्तीकडून ते शुल्क आकारुन घेईल.

**जुबेर इनामदार :-**

ज्या व्यक्तीने जनरेट केले आहे त्यानेच ते करावे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**जुबेर इनामदार :-**

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत केंद्र शासनाकडून आपल्याला आजपर्यंत किती निधी अनुदान स्वरुपात मिळाले.

**मा. सभापती :-**

काही दिले नाही.

**जुबेर इनामदार :-**

फक्त धोरण दिले आहे. बेलवटे साहेब सांगा.

**शरद बेलवटे :-**

माहिती अव्हेलेबल नाही.

**जुबेर इनामदार :-**

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत आलेले अनुदान माहित  नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

जुबेरजी गोषवाऱ्यात विषय आहे त्याचा ते अभ्यास करुन येतात. विषय नाही तर तो अभ्यास कसा करणार?

**जुबेर इनामदार :-**

हा सोपा प्रश्न आहे.

**प्रकरण क्र. ५७ :-**

**बांधकाम व निषकासन कचऱ्याचे (डेब्रिज) संकलन, वाहतुक, पुर्नचक्रीकरण करणे कामाच्या दरांना मान्यता देणेबाबत.**

**ठराव क्र. ५१ :-**

बांधकाम व निष्कासन कचऱ्याचे (डेब्रिज) संकलन, वाहतूक, पुर्नचक्रीकरण करणे **कामी मिरा भाईंदर महानगरपालिकेने ठाणे महानगरपालिकेने नेमलेले मे. मेट्रो वेस्ट हॅन्डलिंग प्रा.लि. या कंत्राटदारास मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील** डेब्रिज व इ. साहित्य वाहतुक करणे, संकलन करणे व त्यावर प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावणे हे काम ठाणे महानगरपालिकेने मंजुर केलेल्या दराने देणेबाबत गोषवाऱ्यात नमुद केलेले आहे.

ठाणे महापालिकेच्या **मे. मेट्रो वेस्ट हॅन्डलिंग प्रा .लि. या कंत्राटदारास** फक्त 6 महिन्याकरीता (फेब्रुवारी 2020 पर्यंत) **मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील** डेब्रिज व इ. साहित्य वाहतुक करणे, संकलन करणे व त्यावर प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावण्याकरीता मंजूरी देऊन तसेच महानगरपालिकेच्या कोणत्याही ठेकेदाराची बांधकाम व निष्कासन, कचऱ्याची वाहतुक व विल्हेवाट लावता कामा नये. जी कंपनी/व्यक्ती बांधकाम व निष्कासन, कचऱ्याची निर्मिती करेल वाहतुक व याची विल्हेवाट करण्याकरीता त्याच मालकाकडून सदरहु कंपनी ते शुल्क आकारेल व महानगरपालिकेने सदरहु शुल्क कंपनीस देवू नये. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरण परिवर्तन मंत्रालयाने केलेल्या नियमाप्रमाणे महानगरपालिकेने बांधकाम व निष्कासन कचऱ्याची साठवणूक व त्यावर प्रक्रिया करणे, त्याची विल्हेवाट लावणे त्यासाठी पायाभुत संरचना उभी करुन प्रकल्प कार्यान्वीत करणे हे बंधनकारक आहे. त्यामुळे प्रशासनाने महापालिका क्षेत्रात प्रकल्प उभारणेकरीता कार्यवाही करावी व त्याचा सविस्तर आराखडा मा. महासभेपुढे मंजुरीस्तव शिफारस करावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील        अनुमोदन :- श्रीम. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ५८, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, दुभाजके इत्यादी ठिकाणी निगा व देखभाल करणेकामी ठेका पध्दतीने मजूर पुरवठा करणेकामास मुदतवाढ मिळणेबाबत.**

मोहन म्हात्रे :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, दुभाजके, स्मशाने इत्यादी ठिकाणी निगा व देखभाल करणेकामाची वार्षिक निविदा मागविण्यात आलेली आहे . ही निविदा मंजूरीकरीता प्रशासनाने त्वरीत सादर करावी व त्याचबरोबर उपरोक्त कामाच्या मुदतवाढीचा प्रस्ताव मान्यतेकरीता सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.**

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय तुमचा ठराव मान्य आहे. जोपर्यंत निविदा प्रक्रियाचा विषय तुमच्याकडे येत नाही तोपर्यंत त्यांना पगार कोण देणार? कर्मचारी काम करणार की नाही करणार की त्यांना तुम्ही घरी बसवता.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

हे कर्मचारी काम करतातच.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही मुदतवाढ दिलीच नाही. तुम्ही गोषवारासहीत मुदतवाढ नविन येईल तेव्हा तुम्ही निविदा प्रक्रिया स्थायी समिती समोर ठेवणार. सध्या तुम्हाला मुदतवाढ पाहिजे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मुदतवाढ पाहिजे सध्या ते काम करतात.

**जुबेर इनामदार :-**

ठरावामध्ये मुदतवाढ नाही.

**मा. सभापती :-**

तोपर्यंत पेमेन्ट होणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

कर्मचाऱ्यांना पेमेन्ट कोण देणार.

**मा. अतिरीक्त आयुक्त :-**

कॉन्ट्रॅक्टरने देणे अपेक्षित आहे कारण त्यांचे कर्मचारी आहेत.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही त्या कॉन्ट्रॅक्टरला मुदतवाढ देणार नाही. कर्मचाऱ्यांनी काम करावे अशी पालिकेनी अपेक्षा ठेवावी. भर पावसामध्ये दुभाजकाचे..................

**मा. सभापती :-**

जुबेरजी देना की नही देना है।

**जुबेर इनामदार :-**

दो क्यों नही दे रहे हो। क्यू नही देते हा तुम्हाला मुदतवाढ द्यायलाच पाहिजे. तुमच्या नियमात मुदतवाढ कुठेच नाही. मग तुम्ही अनियमितपणे मुदतवाढ देत आलात ती द्या.

**धृवकिशोर पाटील :-**

मुदतवाढ देणार परंतु प्रशासनाने विनंती केली. संपूर्ण मिरा भाईंदर शहरातील उद्याने, डिव्हायडर्स, स्मशाने ह्या सर्वांना सुशोभित करण्यासाठी एकत्रित निविदा काढा त्यासाठी भरपूर खर्च होतो.

**मा. सभापती :-**

मुतदवाढ देऊ. सर्व प्रस्ताव एकत्र आले की त्यावेळी देऊ. नाहीतर ते अजून ६ महिने पाठवणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

सध्या मुदतवाढ दिली नाही विषय स्थायी समितीसमोर आला. कर्मचाऱ्यांना तुम्ही घरी बसवणार का? कारण त्यांनी काम केले की तुम्ही करु शकत नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

आम्ही मुदतवाढ नाकारली पण नाही.

**जुबेर इनामदार :-**

नाकारली नाही पण देत ही नाही. तुम्ही गोषवारा सदोष आहे असे सांगा.

**धृवकिशोर पाटील :-**

प्रशासनाने जी निविदा काढायची होती लवकरात लवकर कारवाई करावी आणि त्या संदर्भात एक प्रपोजल आणा.

**जुबेर इनामदार :-**

तुम्हाला सांगायची गरज नाही. त्यांनी काढलेच पाहिजे. विषय मुदत वाढीचा आहे त्यांनी दीढ पानाचा गोषवारा दिला आहे. त्यांनी त्याच्यात इतिहास टाकला आहे. ह्याच्यानंतर त्या कर्मचारी कामावर उभे राहिले. तुम्हाला त्यांना पगार देता येणार नाही.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मा. सभापती महोदय ही जी एकत्रित निविदा प्रक्रिया आहे त्यांचा तांत्रिक लिफाफा काल ओपन केला आहे. दराचा लिफाफा ओपन केल्यानंतर आपण तातडीने प्रोसेस म्हणून पूढच्या स्टॅन्डिंगला विषय येऊ शकेल.

**जुबेर इनामदार :-**

मान्य आहे. आज तुम्ही जो विषय दिलेला आहे. त्याच्यामध्ये मुदतवाढीचा विषय आहे. ठेका मजूर पुरवठा करणेकामी मुदतवाढी सोबत देयक अदा करणेबाबत माणस आहे. त्यांचा देयक अदा करायचे आहे की नाही मुदतवाढ दिली तेच देयक अदा होईल. आम्हाला ऑडिटरनी सांगावे की मुदतवाढ भेटत नाही.

**दिप्ती भट :-**

साहेब आता देखभाल करतात का? कोण करतात.

**जुबेर इनामदार :-**

तेच करतात.

**दिप्ती भट :-**

त्यांना वाढ द्यायची असे तुम्ही बोलता.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मुदतवाढ मागतो.

**दिप्ती भट :-**

मग तुम्ही कशी देणार तिथे देखभाल करता.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सध्या करत आहे.

**दिप्ती भट :-**

कोण करते.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

तेच मजूर करतात.

**दिप्ती भट :-**

आयुक्तांना २५ तारखेला पत्र दिले आता दुसरी २५ झाली अजून त्याचे झाले नाही. त्याच्यामध्ये जो पालिकेचा निधी वापरुन नुकसान झाले त्याची भरपाई कोण भरुन देणार? आयुक्तांना भरपाईसाठी पत्र दिले आहे. महापालिकेनी तिथे वारंवार निधी लावला. फुटबॉल, बॅनर्स जे लावता की आम्ही मैदान बनवतो. आम्ही हे बनवतो. टब बनवण्यासाठी २५ लाख तिथे रबर फ्लोरींग टाकण्यासाठी नाही मी चार वेळा निधी टाकून बनवले. आजपर्यंत त्याच हालतमध्ये आहे. लोकांनी येऊन काय बनवले काय तोडले ते मला माहित नाही. तुम्हाला स्पष्ट पत्र दिले आहे. जॉगर्सपार्क बनवायच्या अगोदर पत्र दिले आहे. त्याच्या अगोदर माझे टब बनले आहे. तुमच्याकडे बजेट नाही पैसे नाही. ही चार वर्षाची गोष्ट आहे. त्याच्यानंतर चार वेळा निधी टाकला. मैदानामध्ये खर्च केला सी.सी. कॅमेरे लावले. तुम्ही बोलता दुस-या टर्मची निधी संपली की आपण वापरु शकत नाही पण ६ महिन्या अगोदर सर्वांची निधी पास केली त्याच्यामध्ये माझा पण निधी पास केला. कारण आम्ही पत्र दिले होते. म्हणून ह्या वर्षी पण गेल्यावर्षीचा निधी द्यायला लागेल. ठेकेदाराची बिल अधिकारीकडून भरपाई करा सर्व पैसे द्या. सी.सी. कॅमेरे लावल्यानंतर त्याची वायर काढून टाकली तिथे गर्दुले येऊन आपल्या पालिकेचे जे शौचालय बांधले ते सर्व तोडून टाकले. २५ तारखेला पत्र दिले त्यांनी सिक्युरिटीला मारले. चार दिवसा अगोदर ब्लेड मारुन त्याचे टाळे पण नाही मी माझ्या घरातून त्या गार्डनला मारायला टाळे दिले. तुम्ही काय बोलता देखभाल दुरुस्ती करता तुम्ही कोणाला पैसे देता. ते अधिका-यांकडून वसूल करायला सांगितले आहे. किंवा ज्यांना कॉन्ट्रॅक्टर दिले आहे त्यांच्याकडून भरपाई करुन घ्या. महापालिकेचा वारंवार निधी तुम्ही वापरायचा त्या निधीचे नुकसान होते त्याची भरपाई कोण करणार. तुम्ही बोलता ना देखभाल दुरुस्ती आता होते काय होते तिथे काहीच होत नाही. २५ तारखेपासून पत्र दिले आहे. अजून कोणी एफ.आय.आर केली नाही. एफ.आय.आर करायचे काम माझे आहे का? ऑफिसरनी तिथे जाऊन तिथे पंचनामा करायला पाहिजे. त्यांनी सी.सी.टी.व्ही. कॅमेरा फुटेज बघायला पाहिजे. पोलिस स्टेशनला जाऊन एफ.आय.आर करायला पाहिजे. त्यासाठी तुमच्याकडे पैसे नसतात.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सन्मा. सभापती महोदय सन्मा. सदस्यांच्या भावनांचा विचार करता त्यांनी जे पत्र दिले आहे त्याच्या अनुषंगाने प्रशासनाच्या स्तरावर चौकशी करुन.................

**दिप्ती भट :-**

साहेब काही होणार नाही. कारण मागच्या स्थायी समितीमध्ये पत्र दिले आहे. त्यांनी बैठक लावली होती. त्याचे उत्तर चार दिवसामध्ये येणार होते ते उत्तर अजून आले नाही. अपेक्षा काय ठेवू साहेब आम्ही बोलतो आणि तुम्ही ऐकता आणि पेपर जाऊन काम होते बाकी काहीच नाही. आमचा पण टॅक्सचा पैसा आहे म्हणून दुःख होते. आमचा निधी बोलतो कारण लोकांनी आम्हाला प्रतिनिधी म्हणून पाठवले आहे जर आम्हाला इथे बोलायची आझादी  नाही तर आमचा काय फायदा? सगळ्याचा अधिकार एक सारखा आहे तर आम्हाला तो अधिकार का भेटत नाही? मुझे खुलासा चाहिए अगर ८ नगरसेवक है तो ८ नगरसेवक को समान अधिकार मिलना चाहिए। जो सब तूटा है उसको कौन भरके देगा।

**जुबेर इनामदार :-**

मजूर पुरवठा का मंजूरी नही दिया तो उनको पगार नही मिलेगा और वो मोर्चा लेकर...........

**दिप्ती भट :-**

मैंने उनको क्या बोला है मला स्पष्ट उत्तर द्या. तुम्ही सगळे झोपून राहिले आहेत. पगार घेऊन तुम्ही ह्या शहराचे नाहीत. तुमचे टॅक्समध्ये पैसे जात नाही म्हणून तुम्हाला हसू येते. आमचे टॅक्सचे १-१ रुपये आम्ही कमवून टाकतो. आमचे फुकटचे पैसे नाहीत आणि आम्ही कुठली वसूली करत नाही. ऑफिसरना ५०-५० लाख रुपये बसून सॅलरी मिळते. आम्हाला वॉर्ड मध्ये रोजचे उत्तर द्यायला लागते. पब्लिक आमच्याकडे येते रोजचे ५०० लोकांना आम्ही काय उत्तर द्यायचे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सन्मा. सभापती महोदय सन्मा. सदस्या त्याच्या भावना व्यक्त करण्याचा एक भाग आहे परंतु कोणाला किती पगार आहे. तो कुठून मिळतो, कोणाच्या टॅक्समधून मिळतो आमच्या शहरातून मिळतो की तुमच्या शहरातून मिळतो अशा संदर्भात अशा पध्दतीने अधिका-याबद्दल बोलण अभिप्रेत नाही. प्रशासन ते सहन करणार नाही.

**दिप्ती भट :-**

रात्री २-२ वाजेपर्यंत ड्यूटी करायचे. आमचे काम आहे अधिका-यांनी फोन बंद करुन टाकायचा. फोन कशाला दिला आहे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सदस्यांनी आपल्या भावना कामाच्या संदर्भात व्यक्त कराव्यात. कोणाच्या इन इफेशियन्सी संदर्भात व्यक्त कराव्या. परंतु कोणाचे पगार किती आहेत, कोणी सदस्य स्वतःच्या उत्पन्नातून हा पगार देत नाहीत.

**दिप्ती भट :-**

साहेब तुम्हाला हसू येते ना.

**श्रीप्रकाश सिंह :-**

दिप्ती मॅडम उनका हसता चेहरा है।

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी बोलण्याच्या संदर्भात ह्या ठिकाणी कोणी हसलेले नाही.

**दिप्ती भट :-**

१२ कोटी दिले त्याचा हिशोब दिला का?

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मा. सभापती महोदय सन्मा. सदस्य विषय सोडून जात आहेत. विषय आहे की जे मजूर आपल्याकडे कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने काम करत आहेत कॉन्ट्रॅक्टरच्या माध्यमातून मजूराची सेवा आपण जी घेतलेली आहे त्यांच्या कामाला मुदतवाढ देण्याच्या संदर्भात विषय आहे. त्यांचा जो मुद्दा आहे कुठली टब आहे. गर्दुल्यानी काय तोडफोड केली आहे. त्याच्या संदर्भात चौकशी करण्याचा विषय आहे. अजेंड्यावरचा विषय वेगळा आहे. सन्मा. सदस्यांची भावना वेगळी आहे. ह्या अर्जावर चौकशी करुन कारवाई करु असे सांगितले आहे.

**दिप्ती भट :-**

एक महिना झाला कधी करणार. सगळ संपल्यावर कोण मरुन जाणार तो वॉचमन एक आहे तो पण माणूसच आहे ना जो सिक्युरीटी असतो............

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मा. सभापती महोदय अशा प्रकारची कुठलीच बाब माझ्या तरी निर्दशनास आली नाही. आता पत्र दिले आहे. विभागात पत्र असेल आम्ही चौकशी करु.

**दिप्ती भट :-**

आयुक्तांना पत्र दिले ते डिपार्टमेंटमध्ये नाही जात मी तेच बोलते सगळ्या डिपार्टमेंटला वेगळे पत्र द्यायचे का?

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

आपण दिलेल्या पत्राप्रमाणे आम्ही निश्चितपणे उचित कारवाई करु. चौकशी करुन कारवाई करु.

**जुबेर इनामदार :-**

प्रभाग समिती ५ चे कार्यालय पुनम सागर हॉस्पीटलमध्ये गेले आहे. तिथे फर्निचर पण नाही आणि अधिकाऱ्याला बसायला जागा पण नाही. टॅक्स भरण्यासाठी लोक दोन्ही बाजूंनी फिरतात. ते सॉफ्टवेअर आणि सर्वर पण नाही त्यामुळे कुठली एक जागा निश्चित करा. सर्वांच्या फाईल हरवल्या तर कोण जिम्मेदार होणार. एका अधिकाऱ्याला जिम्मेदारी देऊन ते बघायला सांगा. प्रभाग समिती क्र. ५ मध्ये काय हालत आहे. बसायला पण जागा नाही. ६ महिन्या अगोदर टेंडर निघाले आहे आणि काम सुरु केले आहे. अजूनपर्यंत कुठल्याच केबीनचे काम झाले नाही. एकाच जागेवर सर्व जाऊन बसले आहेत. बिल भरायला रसाजमध्ये जातात.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ७० :-**

**प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत . ( संगणक विभाग ) - Post Implementation support services, Customization and new development for property tax and water tax application. (संगणक विभाग)**

**ठराव क्र. ६३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका पाणीपुरवठा व मालमत्ता कर या विभागासाठी संगणक आज्ञावली विकसित करणे कामी मे. न्यु इंडिक्ट्रान्स टेक्नोलॉजी प्रा. लि यांच्या समवेत दि.१२/१०/२०१७ रोजी कामाचा वार्षिक करारनामा करुन जा.क्र. मनपा/संगणक/२६७/२०१७-१८, दि.१६/१०/२०१७ रोजी कामाचा कार्यादेश देण्यात आला होता. याकामी दि.१२/०१/२०१९ पर्यंत दोन महिन्याकरिता प्रथम मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर खर्चास मा. स्थायी समिती सभेत ठराव क्र.३७ अन्वये अवलोकन करण्यात आले. तदनंतर याकामी दि.१४/०४/२०१९ ते दि.१३/०८/२०१९ पर्यंत द्वितीय मुदतवाढ देण्यात आली असून मा. स्थायी समितीची मंजूरी प्राप्त झाली आहे. नविन संगणक आज्ञावली विकसित करुन **Data Migration** करणेस साधरणता आणखीन ३ महिन्यांचा कालावधी लागणार असल्याने मे. न्यु इंडिक्ट्रान्स टेक्नोलॉजी प्रा. लि., यांना पुढील ३ महिन्याकरिता (दि.१४/०८/२०१९ पासुन दि.१३/११/२०१९ पर्यंत) मुदतवाढ देणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| Sr.No | PARTICULARS | Monthly Rate in Rs. (Excluding GST) |
|---|---|---|
| 1. | Post implementation Support Services, Customization New Development,Etc in Property tax, Application as per Scope of Work | रू.३७,६४१/- |
| 2. | Rate per Technical person at MBMC office | रू.३२,८००/- |

| | | |
|---|---|---|
| 3. | Hosting of the MBMC applications on dedicated III Tier or IV Tier data Centre in india with data backup and Data Recovery (Two servers) | रू.३७,५८३/- |
| 4. | Post implementation Support Services, Customization New Development,Etc in Water tax, Application as per Scope of Work | रू.२१,७९८/- |

सदर कामी एकूण रु.१,२९,८२२/- मासिक खर्च होणार आहे.

उपरोक्त प्रस्ता**वास** महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम **1949** चे कलम **73(क)** नुसार ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदन :- श्री. श्रीप्रकाश सिंग**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७१, **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ९२ नुसार शिलकी पैशांची गुंतवणूक करणेबाबत.**

**धृवकिशोर पाटील :-**

हा विषय सभापतीनी त्यांच्या अखत्यारित घेतलेला आहे. विषय क्र. ७१,७२,७३,७४,७५ हे विषय सभापतीनी घेतलेले आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ९२ अन्वये शिलकी पैशाची गुंतवणूक करणे हा एक कलम आहे. ह्याच्यामध्ये असे म्हटले आहे महापालिकेनी कोणताही निधी जर तुम्हाला बँकेमध्ये ठेवायचा असेल तर स्थायी समितीच्या मंजूरीने आयुक्तांच्या मंजूरीने ठेवायला पाहिजे. पण तसे काही घडतच नाही. स्थायी समिती सभा दि. २९.०९.२०१८ ला ठराव केला होता. त्याच्यात स्पष्ट म्हटल होत प्रस्तावात प्रशासनाकडून सविस्तर माहिती घेतली असता आतापर्यंत मुदत ठेवी बँकत ठेवण्यापूर्वी स्थायी समितीची मान्यता घेतली नाही. त्याचवेळी ठेवी ठेवताना जाहिररित्या नोटिस देऊन व्याजदर मागवले नाहीत ही कृती वित्तीय क्षेत्राचा भंग करणारी आहेत ह्यावर स्थायी समिती ०२.०९.२०१६ मधील अ.क्र. ५६ मधील निर्णय नियमानुसार झाले नाहीत. ह्यापुढे मुदत ठेवी ठेवताना जाहिर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन बँकेचे व्याजदर मागवण्यात यावे व स्थायी समितीच्या मान्यतेने कारवाई करावी. आतापर्यंत केलेल्या बेकायदेशीर कृतीबाबत चौकशी करुन मुख्यलेखापरिक्षक ह्यांनी स्थायी समितीपूढे मुद्देसूद अहवाल द्यावा. ठराव झाला परंतु ह्या ठरावाची अंमलबजावणी झाली नाही तसेच लेखा परिक्षण अहवाल दिलेला आहे. ह्या लेखा परिक्षणाच्या अहवालामध्ये सुध्दा क्वेरी काढलेली आहे. त्याच्यामध्ये महापालिकेचे लाखो रुपयाचे नुकसान झालेले आहे. परिच्छेद क्र. १८ महापालिकेच्या विविध निधी रक्कमेच्या केलेल्या गुंतवणूक संदर्भात आढळून आलेली अनियमितता ह्यामध्ये कधीपासून अनियमितता आहे की लेखा विभागाने महापालिकेच्या गुंतवणूकीबाबत गुंतवणूक नोंदवही सो ॲन्ड सो काही कागदपत्र लेखा विभागाने उपलब्ध करुन दिली त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की युनियन बँकेमध्ये ठेवलेल्या १७.४८ कोटी समावेश असलेल्या एक्सेस मुदत ठेवीची व विजया बँकेत ठेवलेल्या ५२.२२ रक्कमेच्या ठेवीची मुदत संपली होती आणि मुदत संपल्यावर स्वतःच्या अधिकारात सदर ठेवी आपल्या अधिकारात काढून घेऊन त्याची पुर्नगुंतवणूक स्वतःच्या अधिकारात केली आहे. सदर बाब उपरोक्त कलम ९२ (२) मधील विसंगत असल्याने त्या संदर्भात खुलासा नाही. जुलै २०१८ ला मुदत पूर्व होणाऱ्या ठेवीची पुर्नःगुंवणूक केल्याने लेखा विभागाने अजिबात मंजुरी घेतली नाही. ह्यामध्ये विजया बँकेचे ७.१० टक्के व्याजदर ठेवणे आवश्यक असताना तसे न करता १७ करोड ४८ लाखाची युनियन बँकेने ठेवली त्याचे व्याज ६.८ टक्के म्हणजे जवळ जवळ ३०.३० टक्के चे नुकसान झाले आहे. त्याच्यामुळे ५२.२२ लाख रुपये रक्कमेची एकच ठेवी ठेवली आणि त्यामध्य ६.८ मध्ये आणि ७.१० मध्ये फक्त पाच लाख रुपये ठेवले म्हणजे जिथे आपल्याला बँक व्याज कमी देते तिकडे जास्त पैसे ठेवले आहेत आणि जी बँक जास्त व्याज देते तिकडे कमी पैसे ठेवले आहेत. जी बँक ७.१ टक्के देते तिथे पैसे कमी ठेवले आहेत आणि जी बँक कमी देते तेथे जास्त पैसे ठेवले आहेत. म्हणजे महापालिकेचे ७ लाख रुपये नुकसान झाले आहे बँक सुध्दा हे डायरेक्ट ट्रान्सफर करते. बँकेत जमा

असलेल्या बँकेने परस्पर स्लिप करुन आपल्या खात्यामध्ये फिक्स डिपॉझिट ठेवली आहे. अशा भरपूर बँकेत त्यांनी आपली परवानगी न घेता परस्पर ठेवी ठेवल्या त्या पण करोड रुपयेच्या ठेवी ठेवल्या आहेत. साहेब त्याच बरोबर असा पण एक नियम आहे की जे पैसे आपल्याकडे पडून असतात. त्या पैशाची पण फिक्स डिपॉझिट करणे गरजेचे आहे आणि ह्याच्यामध्ये दिलेले आहे की आपले करोडो रुपये महापालिकेच्या बँकेत असेच पडले होते. त्याची फिक्स डिपॉझिट त्यांनी केलेली नाही त्या व्याजाचे पण नुकसान झालेले आहे. परिच्छेद क्र. १९ मध्ये असे म्हटले आहे की महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ९२ तरतूदीनुसार ठेवणे गरजेचे आहे. परंतु ज्या शिलकी पैशाचा विनियोग ताबडतोब किंवा लवकरात लवकर करता येणे शक्य नसेल तो पैसा व्याजाने शासनाने वेळोवेळी शासन निर्णयाद्वारे बँकामध्ये गुंतविणे आवश्यक आहे. त्यासाठी कलम ९२(२) बँकामध्ये विहीत कारवाईनुसार स्थायी समिती मंजूरीनुसार केले पाहिजे. परंतु माहे जुलै १८ सप्टेंबर ह्या त्रैमासिक कालावधीतील लेखाचे परिक्षण करताना १४ वा वित्त आयोग व विकास निधीच्या खात्यामध्ये खालील प्रमाणे निधी गुंतवणे विना असेच पडून आहे. १४ वित्त आयोगाचे पैसे ५९ लाख २० करोड ४७ लाख विकास निधी १९ करोड २५ लाख आणि आणखी ३१ करोड १० लाख ३० करोड ४० लाख म्हणजे अशाप्रकारे विनावापर करणाऱ्या निधी सुध्दा बँकेत असाच पडून होता आणि हे १०० करोड रुपये आहेत. हे जर फिक्स डिपॉझिट ठेवले असते तर लाखो रुपये इंटरेस्ट महापालिकेला भेटले असते. अशा बेजबाबदार अधिकाऱ्यावरती प्रशासनाने काही कारवाई केली नाही. त्रैमासिक अहवाल लेखा परिक्षणाने देऊन सुध्दा केले नाही. तसेच स्टॅन्डिंगमध्ये ठराव केला तरीसुध्दा ठेवी ठेवताना कारवाई केली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचा ॲक्ट आहे त्याच्यात क्लिअर कट म्हटले आहे की स्टॅन्डिंगच्या मंजूरी शिवाय हे आपण ठेवू शकत नाही. तरी सुध्दा ठेवलेले आहे. २०१६ ला एक ठराव केला होता विषय वेगळा होता आणि त्या विषयामध्ये एक लाईन ॲड केली होती की डायरेक्ट अकाऊन्ट डिपार्टमेंटनी व्याजदर मागवून ठेवाव्यात हा आम्ही ठराव केला पण तो ठराव व्यपगत झाला आहे तरी ह्या ठरावाची कारवाई केलेली नाही. आपला जो अधिनियम आहे त्याप्रमाणे कारवाई केली नाही अशा बेजबाबदार अधिकाऱ्यावरती कारवाई करणे क्रमप्राप्त आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९२ तसेच दि.२९/०९/२०१८ रोजी मा. स्थायी समिती सभेत प्रकरण क्र. ८०, ठराव क्र. ६७ अन्वये महापालिकेच्या शिल्लक रक्कमांची गुंतवणुक अन्वये करावी असा ठराव झाला असतानाही महापालिकेच्या लेखा विभागाने त्याची अमंलबजावणी केली नाही. माहे जुलै २०१८ ते सप्टेबंर २०१८ या कालावधीत लेखा विभागाने महापालिकेच्या शिल्लक रक्कम गुतवणूकीत गंभीर अनियमितता केली असल्याचे आढळून आलेले आहे . मुख्य लेखाधिका-यांनी स्वत:च्या अधिकाराच्या मुदत ठेवी काढून घेऊन त्यांची पुर्ण गुंतवणूक स्वत:च्या अधिकारात केली.

विजया बँकेत ७.१०% व्याजदराने ठेवणे आवश्यक असताना, तसे न करता रु. १७.४८ कोटीच्या ठेवी युनियन बँक ऑफ इंडिया मध्ये द .सा.द.शे ६.८% व्याजदराने गुंतवणुक केल्या व केवळ रु .५२.२२ लाख रक्कमेची एकच ठेव विजया बँकेमध्ये ७.१० व्याजदराने गुंतविण्यात आली लेखा विभागा च्या सदरच्या कृतीमुळे महापालिकेच्या एका वर्षाचे रु.५.२७ लाख व्याज महसूलाचे नुकसान झाले असून विजया बँकेने देऊ केलेल्या ५०० दिवसा करीताच्या व्याजाचा विचार केल्यास रु.७.२२ लाख पैक्षा जास्त रक्कमेच्या नुकसान झाल्याची बाब स्पष्ट होते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९२ नुसार नगरपालिका निधीत जमा असलेल्या ज्या शिलकी पैशाचा विनियोग ताबडतोब किंवा लवकर करता येणे शक्य नसेल तो पैसा व्याजाने शासनाने वेळोवेळी शासन निर्णयाव्दारे कळविलेल्या बँकामध्ये गुंतविणे आवश्यक आहे . त्यासाठी कलम ९२ (२) बॅकामध्ये विहित कार्य पध्दती नुसार स्थायी समितीच्या मंजुरीने आयुक्त महानगरपालिकेच्या वतीने सर्व गुंतवणूकी करतील तथापि माहे जुलै २०१८ ते सप्टेबर २०१८ या त्रैमासिक कालावधीतील लेख्यांचे लेखापरिक्षण करताना १४ वा वित्त आयोग व विकास निधीच्या खात्यामध्ये सुमारे १०० करोड रुपयांचा निधी गुंतवणूकी विना असाच पडुन (IDLE) होता त्यामुळे मनपाचे लाखो रुपयांचे व्याजाचे नुकसान झाले आहे.

त्यामुळे मा. आयुक्त यांनी त्वरीत या बाबीची चौकशी करुन त्यांच्यावर कार्यवाही करुन नुकसान त्यांच्या पगारातून वसुल करावे. तसेच लेखा विभागाने सर्व ठेवी ठेवताना महारा ष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ९२ चा भंग केला आहे असे दिसुन येते व सर्व ठेवीमुळे झालेले नुकसानही त्यांच्या पगारातून वसुल करावे व तसा अहवाल स्थायी समिती पुढे सादर करावा यापुढे महापालिकेने ठेवी ठेवताना कलम ९२ अन्वये योग्य ती कार्यवाही करावी तसेच संबधित अधिका-याने स्थायी समितीचे अधिकाराचे हनन केले असून तसेच महापालिकेचे आर्थिक नुकसान केल्यामुळे त्यांचेवर महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ नुसार कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**दिप्ती भट :-**

अगोदर विषय होता त्याच्यात मी हेच बोललेली की, अधिका-यावर कारवाई करा आणि त्याच्या मानधनामधून करा. पालिकेचे नुकसान झाले आहे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मा. सभापती महोदय एखाद्या अधिका-याच्या पगारातून रक्कम वसूल करणे.

**धृवकिशोर पाटील :-**

शक्य नाही.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

शक्य नाही असे नाही दोषी असेल तर वसूल केलेच पाहिजे. परंतु सभागृहात ठराव मांडण्यापूर्वी संबंधीतांचे म्हणणे मांडण्याची संधी द्यावी अशी विनंती करतो.

**धृवकिशोर पाटील :-**

१) मी जे बोललो आहे ह्या ॲक्टमध्ये आहे. २) जो ठराव केला आहे त्यानुसार करतो. ३) जो लेखापरिक्षक अहवाल आहे ह्या महापालिकेचा अहवाल आहे. त्याच्यामध्ये अनियमितता आढळून येते. ४) अजून एक अहवाल विनियोग विना विनियोग असलेले पैसे हे फॅक्ट आणि फॅक्चर आहेत ते तुमचेच आहेत ना. जर हे पत्र महापालिकेच्या एका डिपार्टमेंटनी केले आहे तर ते पॉसिबल नाही. आम्ही काही जरी ठराव केला तरी महापालिका ॲक्टमध्ये जे असेल त्याप्रमाणे वागणे प्रत्येक अधिका-याला कम्पलसरी असते. त्याप्रमाणे त्यांनी केले पाहिजे. परंतु समजा आम्ही एखाद वेळी ठराव चुकीचा केला तर महापालिकेच्या ॲक्टमध्ये काय आहे त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. लेखा परिक्षण अहवाल तुम्ही असे म्हणता का की त्या डिपार्टमेंटनी चुकीचा अहवाल दिला आहे. म्हणजे हे चुकीचे असणार आम्ही ह्याच्यात असे म्हटले असते चौकशी करुन मुख्य लेखापरिक्षकांनी स्थायी समितीमध्ये अहवाल सादर करा. एक वर्ष होत आले परंतु अहवाल सादर केला नाही. म्हणजे आमच्या अधिकाराच हनन केले आहे. तुम्ही बोलता ते १०० टक्के बरोबर आहे. ठराव करायच्या अगोदर संबंधित अधिका-याला संधी दिली पाहिजे. परंतु आम्ही जे फॅक्टस आणि फॅर्क्टस मांडले आहेत ते तुमच्या अहवालाने, ठरावाने आणि ॲक्टप्रमाणे मांडले आहेत. हा सूर्य आणि हा जयद्रथ जर असा आम्ही मोघम बोलतो आरोप केले असते चारी डॉक्युमेंट तुमच्या समोर प्रूफ केले आहेत.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मा. सभापती महोदय, सन्मा. सदस्य धृवकिशोर पाटील साहेबांनी जी वस्तूस्थिती मांडली आहे ती डीनाय करण्याचा प्रश्नच येत नाही. जे डॉक्यूमेंटस रेकॉर्डवर आहेत ते आहेत. ज्या बँकेमध्ये निधी ठेवला आहे त्या बँकेमध्ये ठेवलेलाच आहे. जो व्याजाचा दर मिळाला तो मिळालाच आहे त्यापेक्षा जास्त एखाद्या बँकेनी ऑफर केली असेल आणि तो मिळाला नसेल तर तो नाही मिळाला त्याच्याबद्दल वस्तूस्थिती चूकीची आहे असे मी म्हणत नाही. आपण जे डॉक्युमेंट ऑथेन्टीक आहेत तेच सभागृहात सादर केले. त्याच्याबद्दल सुध्दा शंका नाही परंतु ठरावाच्या अनुषंगाने एखाद्या कर्मचा-यावर शास्ती लादली जाणार आहे. होणा-या नुकसानीची भरपाई करण्याच्या संदर्भात जेव्हा आपण स्टेप उचलू तेव्हा त्याच्याकडून असा डिले का झाला किंवा त्याची कारणे काय आहेत हेच स्पष्टीकरण देण्यासाठी संधी उपलब्ध व्हावी. एवढेच मी सभागृहात नमूद करत आहे त्यांनी त्यांचे म्हणणे मांडल्यानंतर आपल्याला निर्णय घेणे क्रमप्राप्त आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

आयुक्तांनी त्यांची चौकशी करायची जर आयुक्तांना वाटले हे नियमाप्रमाणे आहे तर इट्स ओके ना. आयुक्त डिसीजन घेतील. हे फॅक्ट आणि फॅक्टर आम्ही महापालिकेच्या कागदपत्रानी बोलतो.

**शरद बेलवटे :-**

पहिला मुद्दा तुमचा ठराव मला मिळालेला नाही. तो जर मिळाला असता तर मी इम्पलीमेंटेशन नक्कीच केले असते. दुसरा मुद्दा तुम्ही म्हणता अखर्चिक निधी मला कमिटेड एक्सपेंडीचर जो आहे तो सध्या महिन्याचा २५ करोड आहे. त्याच्यात साफसफाई वगैरे सर्व पकडून त्याच्यात खर्चिक राहणारा जो निधी आहे त्याला प्रत्येक बँकेकडून मी फ्लेक्झी डिपॉझिटची सुविधा निर्माण करुन घेतली आहे आणि त्याचे वेळोवेळी प्रत्येक बँकेकडून व्याज मिळते ते पण वापरु शकतो. राहीले कुठचेही अखर्चिक निधी गुंतवणूक करताना तुमची परवानगी घेतली पाहिजे. हे मला मान्य आहे. परंतु हे जे निधी गुंतवणूक करतो हे तत्कालीन महापालिका असताना वेगवेगळे राखीव निधी ठेवले आहेत त्याची मुदत संपल्यानंतर पुर्नःगुंतवणूक करतो नव्याने कुठलीही

गुंतवणूक करत नाही. तुम्हाला असे वाटत असेल ते एका बँकेत आहे असेही नाही. प्रत्येक वेळेला एक जाहिर आव्हान देतो. प्रत्येक बँकेत पर्सनली माझा माणूस लेटर घेऊन जातो. त्यानंतर वर्तमानपत्रात प्रसिध्दी देतो त्यातून जो मॅक्झीमम रेट येतो त्यालाच आपण देतो. ह्याबाबत एजीचे देखील ऑडिट होऊन गेले आहे लोकल फंडचे देखील ऑडिट झाले आहे. मुख्य लेखापरिक्षकांनी देखील ते तपासले आहेत. त्याच्यावर त्यांच्या स्वाक्ष-या आहेत आणि मी स्वतःच्या मर्जीत काही केले नाही. आयुक्तांच्या मंजूरीनेच सर्व केले आहे. तुम्ही आता माझ्यावर ७ लाखाचा ठपका ठेवता परंतु ज्यावेळेला ११ आणि १२ टक्के एम.एम.आर.डी.ए लोन वरती व्याज आकारत होती त्यावेळी आम्ही ८ वेळेला पत्रव्यवहार करुन चंद्रशेखर असताना ८ टक्के व्याजानी मी हे करुन आणले. १० करोडचा ज्या वेळेला फायदा केला तो कोणी पाहिला नाही. फायनान्शीयल रिपोर्ट म्हणजे मी ज्या ठिकाणी असतो माझ्याच खिशातून खर्च होते ह्याच भावनेने मी करतो. आतापर्यंत तसेच करत आलो आहेत असा जाणीवपूर्वक किंवा शंका असेल तर माझ्याकडे रेकॉर्ड आहे तो पहा.

**धृवकिशोर पाटील :-**

२९ सप्टेंबर २०१८ रोजी जो ठराव केला आहे बेलवटे साहेब तुम्ही ४-५ मुद्दे क्लेरिफाय केले. तुमच्याच मुद्दयावर धरुन मी बोलतो. हा महापालिकेचा इसारा आहे. आपण महापालिकेतच केला आहे. ह्या स्टॅन्डिंगमध्ये केला आहे आणि ह्यावेळेला आपण उपस्थित सुध्दा होता त्यावेळी आपण २०१६ ठराव पण दाखवला हा महापालिकेचा ठराव आहे. हा ठराव सचिव डिपार्टमेंटकडे जातो. सचिव डिपार्टमेंट तो ठराव संबंधित विभागाला पाठवतो. ही सिस्टम आहे. हे आमचे काम नाही. आमचे काम आहे आम्ही ठराव केला. हा ठराव करताना तुम्ही उपस्थित होता. तुम्ही पण आम्हाला त्यावेळी सांगितले होते की २०१६ रोजी तत्कालीन सभापती आणि तत्कालीन स्टॅन्डिंग कमिटीच्या चेअरमनने त्याच्यामध्ये एक लाइन टाकली होती की शिलकी पैसे गुंतवणूक करण्याकरिता संपूर्ण अधिकार आम्ही अकाऊंट डिपार्टमेंट दिले आहेत. ह्याचा अर्थ असा आहे तुम्हाला झालेल्या ठरावाची कल्पना असली पाहिजे. जर तुम्हाला ठराव नाही भेटला तर तुमचे पण यू आर अल्सो इक्वीवेलेन्ट लायबल की माझ्या डिपार्टमेंटसाठी एक ठराव झाला आहे. माझे पण तेवढेच कर्तव्य आहे की तो ठराव मागवून घेणे. तुम्ही सांगितले की तुम्ही १० करोड आणले. १० करोड रुपयेचा फायदा केला तर महापालिकेच्या सर्व सदस्यांनी वेळोवेळी ज्या अधिका-यांनी चांगले काम केले आहे त्याची पाठ थोपटली आहे. त्याचा सत्कार सुध्दा केलेला आहे. त्यांचे अभिनंदन पण केलेले आहे. सर तुम्ही म्हणतात तुमच्याकडे पैसे आहे त्याच्यातले २५ कोटी खर्च आहे. दॅट इज युअर लुकआऊट नॉट अवर लुकआऊट आमचा लुकआऊट एवढा आहे आम्हाला ज्यावेळी लोकांनी निवडून दिल्यानंतर आमचे फक्त काम आहे तुमचे जे काम होते ते काम योग्य पध्दतीने होते की नाही हे बघणे आमचे काम आहे. आम्हाला एखादी अनियमितता आढळून आली तर आम्ही प्रशासनाच्या निर्दशनास आणू द्यायचे काम आहे. लेखापरिक्षण जो अहवाल आहे हा वेळोवेळी सर्व डिपार्टमेंटला जातो. व्यवस्थित संधी लेखापरिक्षा विभागाने दिलेली आहे. त्याच्यात अहवाल प्राप्त केला त्याचे क्लेरिफिकेशन ते डिपार्टमेंट करते. आपले ज्या बँकेमध्ये अकाऊंट आहेत त्यांना स्विप अकाऊंट करुन डायरेक्ट एफ.डी. मध्ये ठेवतात. आपला कायद्याचा भंग आहे. मी कसे ठेवू शकतो की तुम्ही इन्टीमेट तरी केले पाहिजे. ते पण केले नाही ह्याच्यामध्ये लिहिलेले आहे की तुमच्याकडे पैसे आहेत. ते तुम्ही त्याच्यात ठेवले पाहिजेत. हे तुमचेच फॅक्ट आणि फॅक्टर आहेत. मी दुस-या कोणाचे डॉक्युमेंट वाचले नाहीत. मी सगळे महापालिकेचे डॉक्युमेंट्स आणले आहेत आणि जी अनियमितता झाली आहे त्याबद्दल आम्ही केले आहे. जी अनियमितता आढळून आली त्या अनियमिततेप्रमाणे आम्ही तो ठराव केला आहे. ह्याच्यामध्ये आयुक्त चौकशी करतील आणि त्यांना वाटले की अकाउंट डिपार्टमेंटनी व्यवस्थित काम केले आहे तर काहीच होणार नाही. प्रभाग अधिकारीनी इललिगल होर्डिंग काढले नाही म्हणून शास्ती लावली आणि इथे अहवालामध्ये लाखो रुपयाचे नुकसान दिसते ते माहित पडत नाही. त्याच्यावर शास्ती लागत नाही आणि एक बोर्ड काढले नाही म्हणून शास्ती लागते. हे कुठेतरी विसंगत वाटले मनाला पटले नाही आणि म्हणून हा विषय काढला. तुमच्यावर ठपका ठेवला नाही.

**शरद बेलवटे :-**

मी प्रामाणिकपणे सांगतो इथे खर्च करताना माझ्या खिशातूनच खर्च होतो ह्या भावनेनेच केले आहे.

**जुबेर इनामदार :-**

बेलवटे साहेब महापालिकेचे जेवढे अकाऊंट आहेत आपला जो पैसा जमा होत असेल खर्च माध्यमातून पाणी पुरवठातून प्रत्येक अकाऊंट तुम्ही स्विपमध्ये कनवर्ट केले आहे का? ऑटो स्विपमध्ये किती टक्के व्याज मिळते.

**शरद बेलवटे :-**

साडे चार टक्के व्याज मिळते.

**जुबेर इनामदार :-**

ठेवी ठेवल्यातरी ८.५० टक्केवर जात असेल. इतका फरक आहे.

**शरद बेलवटे :-**

ठेवी ठेवल्यानंतर पेमेंट आल्यानंतर रिक्वायरमेंटचे....................

**जुबेर इनामदार :-**

आढावा विषय करताना................

**धृवकिशोर पाटील :-**

त्याच्यामध्ये नाही त्यामध्ये करोडो रुपये आहेत ह्याच्यामध्ये १९१ करोड १३ लाख आहेत. ९५ करोड आहेत, ११३ करोड आहेत म्हणजे करोडो रुपयाचे निधी आहेत.

**जुबेर इनामदार :-**

तो निधी किती दिवस राहीला.

**धृवकिशोर पाटील :-**

आपल्याला जो अहवाल आहे त्या अहवालावर नाही. किती राहीला त्याची इन्क्वायरी कोण करणार?

**जुबेर इनामदार :-**

ठेवलेला पैसा ठेवी ठेवायची असली तर कमीत कमी वर्षभर ११ महिने अशा मुदतीप्रमाणे ठेवायला पाहिजेत. १ महिन्याचे पण ठेवता येते असा काही प्रॉब्लेम नाही.

**शरद बेलवटे :-**

९१ डेज हीच ठेवावी लागते परंतु काय झाले ते विड्रॉ करायला लॉस आहेत.

**धृवकिशोर पाटील :-**

अकाऊंट्स ऑफिसर आपण आहात. अकाऊंट स्विप करताना बँकेचा मॅनेजर अकाऊंट्स होल्डरची परमिशन घेतो.

**जुबेर इनामदार :-**

नाही घेत ऑटो स्विपचे एकदा ॲप्लीकेशन केले की विषय झाला.

**धृवकिशोर पाटील :-**

ॲप्लीकेशन केल्यानंतर ॲप्लीकेशन कोणी केले साहेबांनी केले. साहेब करु शकत नाही. ॲज पर ९२ ॲक्ट साहेब करु शकत नाही.

**जुबेर इनामदार :-**

स्थायी समिती समोर आणायला पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय चर्चा असू द्या ठराव करु नका. माझी सभागृहाला विनंती आहे ह्या विषयावर प्रशासनाचा गोषवारा नाही. ठराव करु नका. चौकशी हा शब्द ठेवा पुढचे शब्द वगळा.

**दिप्ती भट :-**

हा ठराव करणार तर मी जे अगोदर बोलली ते योग्य होत. तुम्ही सगळ्यावर कारवाई करा.

**जुबेर इनामदार :-**

धृवजी आपण जेव्हा असे ठराव एक मताने करु त्यावेळी ५६ ची कारवाई झालीच पाहिजे. ५६ च्या कारवाईला तिथून तो वाचला नाही पाहिजे. त्याच्यावर खरोखर कारवाई झाली पाहिजे. असा थातूरमातूरमध्ये कारवाई असेल तर अशा विषयाचा वापर करणे हे योग्य नाही. तुम्ही चौकशीचा विषय करा. बाकीचा जो मुद्दा आहे तो वगळा ही माझी तुम्हाला विनंती आहे तसे सांगा.

**दिप्ती भट :-**

ह्याच्यावर पण चौकशी करा बाकीच्यावर पण करा ५६ ची कारवाई सगळ्यावर करा.

**धृवकिशोर पाटील :-**

तुम्हाला असे काही वाटते का?

**जुबेर इनामदार :-**

माझा विश्वास आहे बेलवटे तसे कुठल्या ही विषयामध्ये अशी मोठी चूक करणार नाहीत.

**धृवकिशोर पाटील :-**

जर अकाऊंट ऑफिसरनी चूक केली नसेल तर आपल्याला ऐकायची गरज नाही.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाचा गोषवारा नसताना आढाव्याचा विषय होता. आढाव्याच्या विषयामध्ये केलेला ठराव प्रामाणिक केलेला ठराव त्याच्या चौकशीच्या बाजूने आमचा विरोध नाही. मात्र अधिकाऱ्यावर आढाव्याच्या विषयामध्ये ५६ च्या अन्वये कारवाई करायचा हा विषय तुम्ही ठरावामध्ये मांडला आहे. त्याचा निषेध करतो आम्ही त्याच्या बाजूने नाहीत.

**प्रकरण क्र. ७१ :-**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ९२ नुसार शिलकी पैशांची गुंतवणूक करणेबाबत.**

**ठराव क्र. ६४ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९२ तसेच दि.२९/०९/२०१८ रोजी मा. स्थायी समिती सभेत प्रकरण क्र. ८०, ठराव क्र. ६७ अन्वये महापालिकेच्या शिल्लक रक्कमांची गुंतवणुक अन्वये करावी असा ठराव झाला असतानाही महापालिकेच्या लेखा विभागाने त्याची अमंलबजावणी केली नाही . माहे जुलै २०१८ ते सप्टेबंर २०१८ या कालावधीत लेखा विभागाने महापालिकेच्या शिल्लक रक्कम गुतवणूकीत गंभीर अनियमितता केली असल्याचे आढळून आलेले आहे. मुख्य लेखाधिका-यांनी स्वत:च्या अधिकाराच्या मुदत ठेवी काढून घेऊन त्यांची पुर्ण गुंतवणूक स्वत :च्या अधिकारात केली.

विजया बँकेत ७.१०% व्याजदराने ठेवणे आवश्यक असताना, तसे न करता रु. १७.४८ कोटीच्या ठेवी युनियन बँक ऑफ इंडिया मध्ये द .सा.द.शे ६.८% व्याजदराने गुंतवणुक केल्या व केवळ रु .५२.२२ लाख रक्कमेची एकच ठेव विजया बँकेमध्ये ७.१० व्याजदराने गुंतविण्यात आली लेखा विभागाच्या सदरच्या कृतीमुळे महापालिकेच्या एका वर्षाचे रु.५.२७ लाख व्याज महसूलाचे नुकसान झाले असून विजया बँकेने देऊ केलेल्या ५०० दिवसा करीताच्या व्याजाचा विचार केल्यास रु.७.२२ लाख पैक्षा जास्त रक्कमेच्या नुकसान झाल्याची बाब स्पष्ट होते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९२ नुसार नगरपालिका निधीत जमा असलेल्या ज्या शिलकी पैशाचा विनियोग ताबडतोब किंवा लवकर करता येणे शक्य नसेल तो पैसा व्याजाने शासनाने वेळोवेळी शासन निर्णयाव्दारे कळविलेल्या बँकामध्ये गुंतविणे आवश्यक आहे . त्यासाठी कलम ९२ (२) बँकामध्ये विहित कार्यपध्दती नुसार स्थायी समितीच्या मंजुरीने आयुक्त महानगरपालिकेच्या वतीने सर्व गुंतवणूकी करतील तथापि माहे जुलै २०१८ ते सप्टेबर २०१८ या त्रैमासिक कालावधीतील लेख्यांचे लेखापरिक्षण करताना १४ वा वित्त आयोग व विकास निधीच्या खात्यामध्ये सुमारे १०० करोड रुपयांचा निधी गुंतवणूकी विना असाच पडुन (IDLE) होता त्यामुळे मनपाचे लाखो रुपयांचे व्याजाचे नुकसान झाले आहे.

त्यामुळे मा. आयुक्त यांनी त्वरीत या बाबीची चौकशी करुन त्यां च्यावर कार्यवाही करुन नुकसान त्यांच्या पगारातून वसुल करावे. तसेच लेखा विभागाने सर्व ठेवी ठेवताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ९२ चा भंग केला आहे असे दिसुन येते व सर्व ठेवीमुळे झालेले नुकसानही त्यांच्या पगारातून वसुल करावे व तसा अहवाल स्थायी समिती पुढे सादर करावा यापुढे महापालिकेने ठेवी ठेवताना कलम ९२ अन्वये योग्य ती कार्यवाही करावी तसेच संबधित अधिका-याने स्थायी समितीचे अधिकाराचे हनन केले असून तसेच महापालिकेचे आर्थिक नुकसान केल्यामुळे त्यांचेवर महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ नुसार कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७२, **त्रैमासिक जमा-खर्चाच्या अनुपालन अहवालाबाबत.**

**जुबेर इनामदार :-**

विशेष बैठक लावून आढाव्याचे विषय घेतले आहेत ना. तुम्ही पुन्हा उद्या बैठक घ्या. तुमच्या सोयीप्रमाणे पुढच्या आठवड्यात घ्या. आचार संहिता लागायच्या अगोदर घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७६, **डॉ. मकरंद फुलझेले यांचे अपिलावर निर्णय घेणे.**

**राकेश शहा :-**

डॉ. मकरंद फुलझेले यांनी अपिल अर्जान्वये ते सेवेत असताना त्यांच्याकडे वैद्यकिय अधिक्षक पदाचा पदभार असल्याने तसेच कामावर असताना झालेल्या विषाणुजन्य इंफेक्शनमुळे चार महिने Tracheotomy यासाठी त्यांनी लिलावती हॉस्पीटल मध्ये उपचार घेतलेले असुन अजुनही त्यांची तब्येत पूर्ववत झाली नसल्याने सद्यस्थितीतही ते खजगी प्रॅक्टिस करू शकत नसल्याने त्यांस देण्यात आलेला N.P.A. वसुल करू नये अशी विनंती केली आहे. तसेच त्यांनी आजारपणामुळे मोठया प्रमाणात आर्थिक व मानसिक नुकसान झालेले असल्याचे नमूद केले आहे. सद्यस्थितीत देखील त्यांच्यावर उपचार सुरू असुन त्याकरीता त्यांस आर्थिक गरज असल्याने त्यांचा मानवतेच्या दृष्टीकोनातुन सहानुभूतीवूर्पक विचार करून शिक्षा रद्द करणे बाबत त्यांनी मा. स्थायी समितीकडे केलेल्या विनंतीच्या अनुषंगे मा. स्थायी समितीने विधी विभागाकडून अभिप्राय घेतला.

मिरा भाईंदर महानगरपालिका विधी विभागाकडून प्राप्त अभिप्रायाच्या अनुषंगे व डॉ. मकरंद फुलझेले यांच्या आजाराचा व त्यावर उपचारार्थ झालेल्या खर्चाचा विचार करता मानवतेचे दृष्टीकोनातुन सकारात्मक विचार करून त्यांच्यावर लावण्यात आलेली शास्ती रद्द करणे योग्य होईल. या करीता डॉ. मकरंद फुलझेले यांचेवर लावण्यात आलेली शास्ती रद्द करणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**श्रीप्रकाश सिंग :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ७६ :-**

**डॉ. मकरंद फुलझेले यांचे अपिलावर निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ६५ :-**

डॉ. मकरंद फुलझेले यांनी अपिल अर्जान्वये ते सेवेत असताना त्यांच्याकडे वैद्यकिय अधिक्षक पदाचा पदभार असल्याने तसेच कामावर असताना झालेल्या विषाणुजन्य इंफेक्शनमुळे चार महिने Tracheotomy यासाठी त्यांनी लिलावती हॉस्पीटल मध्ये उपचार घेतलेले असुन अजुनही त्यांची तब्येत पूर्ववत झाली नसल्याने सद्यस्थितीतही ते खजगी प्रॅक्टिस करू शकत नसल्याने त्यांस देण्यात आलेला N.P.A. वसुल करू नये अशी विनंती केली आहे. तसेच त्यांनी आजारपणामुळे मोठया प्रमाणात आर्थिक व मानसिक नुकसान झालेले असल्याचे नमूद केले आहे. सद्यस्थितीत देखील त्यांच्यावर उपचार सुरू असुन त्याकरीता त्यांस आर्थिक गरज असल्याने त्यांचा मानवतेच्या दृष्टीकोनातुन सहानुभूतीवूर्पक विचार करून शिक्षा रद्द करणे बाबत त्यांनी मा. स्थायी समितीकडे केलेल्या विनंतीच्या अनुषंगे मा. स्थायी समितीने विधी विभागाकडून अभिप्राय घेतला.

मिरा भाईंदर महानगरपालिका विधी विभागाकडून प्राप्त अभिप्रायाच्या अनुषंगे व डॉ. मकरंद फुलझेले यांच्या आजाराचा व त्यावर उपचारार्थ झालेल्या खर्चाचा विचार करता मानवतेचे दृष्टीकोनातुन सकारात्मक विचार करून त्यांच्यावर लावण्यात आलेली शास्ती रद्द करणे योग्य होईल. या करीता डॉ. मकरंद फुलझेले यांचेवर लावण्यात आलेली शास्ती रद्द करणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदन :- श्री. श्रीप्रकाश सिंग**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७७, **श्रीम. छाया अशोक आल्हाट यांचे अपिलावर निर्णय घेणे.**

**राकेश शहा :-**

श्रीम. छाया अशोक अल्हाट या सफाई कामगार या पदावर वन विभागात विना परवाना गैरहजर राहील्याने त्यांची जा. क्र. मनपा/आस्था/84/2018 दि.13/04/2018 रोजीचे आदेशाअन्वये ज्ञापन व दोषारोप पत्र बजावून चौकशी प्रस्तावीत करण्यांत आली होती.

श्रीम. छाया अशोक अल्हाट सफाई कामगार यांची विना परवाना गैरहजरीबाबत विभागीय चौकशी करून चौकशी अहवालानुसार मा. आयुक्त यांनी अंतिम निर्णय देऊन खालील प्रमाणे शास्ती लादण्यांत आलेली आहे.

१) श्रीम. छाया अशोक अल्हाट (स.का.) या विभागीय चौकशीत दोषी ठरत असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 मधील नियम-47(1)(ए) मधील तरतुदीनुसार दि. 22/07/2019 रोजी कामावर हजर करणेपर्यंतचा गैरहजर कालावधी हा विनावेतन सेवेतील खंड समजण्यात येत आहे. तसेच सदरचा कालावधी सेवा निवृत्तीच्या प्रयोजनासाठी ग्राहय धरण्यात येणार नाही.

२) श्रीम. छाया अशोक अल्हाट (स.का.) सतत विनापरवानगी जास्त कालावधी गैरहजर राहील्यामुळे त्यांचे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम-1979 मधील नियम-5(1) (पाच) नुसार वेतन समयश्रेणीतील खालच्या टप्प्यावर आणण्यात येत आहे.

३) श्रीम. छाया अशोक अल्हाट (स.का.) यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम-1979 मधील नियम-5(1)(चार) नुसार पुढील दोन वेतनवाढी भविष्यकालीन वेतनवाढीवर परीणाम होईल अश्या रितीने रोखणेची शिक्षा फर्मावण्यात येत आहे.

४) श्रीम. छाया अशोक अल्हाट (स.का.) यांना मा. जिल्हा शल्य चिकीत्सक, ठाणे यांचेकडील दि. 02/06/2017 रोजीचे काम करण्यास सक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्रानुसार यापूर्वीचा त्याच्या सेवेतील सतत गैरहजर कालावधी पहाता त्यांना आदेशाच्या दिनांकापासून फेर नियुक्ती समजून कामावर हजर करून घेण्यांत येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम-1979 मधील नियम-18 व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम-56 अन्वये श्रीम. छाया अशोक अल्हाट (स.का.) यांनी अपिल दाखल करून त्यांचेवर लादण्यात आलेल्या शिक्षेमुळे आर्थिक नुकसान तसेच सेवा निवृत्तीनंतर मिळणाऱ्या सर्व लाभावर परिणाम होणार असून एकाच गैरवर्तणुकीबद्दल एकापेक्षा अनेक वेगवेगळया शिक्षा लादणे नैसर्गिक न्यायास धरून नाही.

त्यामुळे वरील अ.क्र. 1 व 4 अन्वये लादण्यात आलेल्या शास्ती ऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 चे कलम-47(2) अन्वये अनुपस्थितीचा कालावधी भुतलक्षी प्रभावाने वैद्यकीय कारणास्तव असाधारण रजा अर्हताकारी सेवा म्हणून हिशोबात धरण्यात यावी.

तसेच अनु. क्र. 2 श्रीम. छाया अशोक अल्हाट (स.का) याचीं यापूर्वीची 11 वर्षे 10 महिने कालावधीची निरंतर सेवा पहाता सदरची शास्ती दुरगामी परिणाम करणारी असल्याने शिथिल करण्यात येते.

अ.क्र.3- श्रीम. छाया अशोक अल्हाट (स.का.) यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम-1979 मधील नियम-5 (1) (चार) नुसार पुढील दोन वार्षिक वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम न होता वेतनवाढ रोखणेची शास्ती देण्यांत यावी.

तसेच श्रीम. छाया अशोक आल्हाट (स.का.) यांचा वैद्यकीय कारणास्तव गैरहजर कालावधी हा सेवा निवृत्तीच्या प्रयोजनार्थ ग्राहय धरण्यास ही सभा मंजूरी देत आहे. असा ठराव मांडत आहे.

**श्रीप्रकाश सिंह :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ७७ :-**

**श्रीम. छाया अशोक आल्हाट यांचे अपिलावर निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ६५ :-**

श्रीम. छाया अशोक अल्हाट या सफाई कामगार या पदावर वन विभागात विना परवाना गैरहजर राहील्याने त्यांची जा. क्र. मनपा/आस्था/84/2018 दि.13/04/2018 रोजीचे आदेशाअन्वये ज्ञापन व दोषारोप पत्र बजावून चौकशी प्रस्तावीत करण्यांत आली होती.

श्रीम. छाया अशोक अल्हाट सफाई कामगार यांची विना परवाना गैरहजरीबाबत विभागीय चौकशी करून चौकशी अहवालानुसार मा. आयुक्त यांनी अंतिम निर्णय देऊन खालील प्रमाणे शास्ती लादण्यांत आलेली आहे.

१) श्रीम. छाया अशोक अल्हाट (स.का.) या विभागीय चौकशीत दोषी ठरत असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 मधील नियम-47(1)(ए) मधील तरतुदीनुसार दि. 22/07/2019 रोजी कामावर हजर करणेपर्यंतचा गैरहजर कालावधी हा विनावेतन सेवेतील खंड समजण्यात येत आहे. तसेच सदरचा कालावधी सेवा निवृत्तीच्या प्रयोजनासाठी ग्राहय धरण्यात येणार नाही.

२) श्रीम. छाया अशोक अल्हाट (स.का.) सतत विनापरवानगी जास्त कालावधी गैरहजर राहील्यामुळे त्यांचे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम-1979 मधील नियम-5(1) (पाच) नुसार वेतन समयश्रेणीतील खालच्या टप्प्यावर आणण्यात येत आहे.

३) श्रीम. छाया अशोक अल्हाट (स.का.) यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम-1979 मधील नियम-5(1)(चार) नुसार पुढील दोन वेतनवाढी भविष्यकालीन वेतनवाढीवर परीणाम होईल अश्या रितीने रोखणेची शिक्षा फर्मावण्यात येत आहे.

४) श्रीम. छाया अशोक अल्हाट (स.का.) यांना मा. जिल्हा शल्य चिकीत्सक, ठाणे यांचेकडील दि. 02/06/2017 रोजीचे काम करण्यास सक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्रानुसार यापूर्वीचा त्याच्या सेवेतील सतत गैरहजर कालावधी पहाता त्यांना आदेशाच्या दिनांकापासून फेर नियुक्ती समजून कामावर हजर करून घेण्यांत येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम-1979 मधील नियम-18 व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम-56 अन्वये श्रीम. छाया अशोक अल्हाट (स.का.) यांनी अपिल दाखल करून त्यांचेवर लादण्यात आलेल्या शिक्षेमुळे आर्थिक नुकसान तसेच सेवा निवृत्तीनंतर मिळणाऱ्या सर्व लाभावर परिणाम होणार असून एकाच गैरवर्तणुकीबद्दल एकापेक्षा अनेक वेगवेगळया शिक्षा लादणे नैसर्गिक न्यायास धरून नाही.

त्यामुळे वरील अ.क्र. 1 व 4 अन्वये लादण्यात आलेल्या शास्ती ऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 चे कलम-47(2) अन्वये अनुपस्थितीचा कालावधी भुतलक्षी प्रभावाने वैद्यकीय कारणास्तव असाधारण रजा अर्हताकारी सेवा म्हणून हिशोबात धरण्यात यावी.

तसेच अनु. क्र. 2 श्रीम. छाया अशोक अल्हाट (स.का) यांची यापूर्वीची 11 वर्षे 10 महिने कालावधीची निरंतर सेवा पहाता सदरची शास्ती दुरगामी परिणाम करणारी असल्याने शिथिल करण्यात येते.

अ.क्र.3- श्रीम. छाया अशोक अल्हाट (स.का.) यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम-1979 मधील नियम-5 (1) (चार) नुसार पुढील दोन वार्षिक वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम न होता वेतनवाढ रोखणेची शास्ती देण्यांत यावी.

तसेच श्रीम. छाया अशोक आल्हाट (स.का.) यांचा वैद्यकीय कारणास्तव गैरहजर कालावधी हा सेवा निवृत्तीच्या प्रयोजनार्थ ग्राहय धरण्यास ही सभा मंजूरी देत आहे. असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदन :- श्री. श्रीप्रकाश सिंग**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७८, **अधिकारी/कर्मचाऱ्यांना लावलेल्या शास्तीवर निर्णय घेणे.**

**मा. सभापती :-**

प्रभाग अधिकारी आणि सचिवावर मा. आयुक्तांनी शास्ती लावली आहे त्यांनी वेळेवर उत्तर दिले नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

पिछले साल में कूछ लोगो ने इललिगल होर्डिंग लगाया था तो वो इललिगल है इसके लिए प्रभाग अधिकारी जिम्मेदार होता है वो होर्डींग निकालो या उसपर ॲक्शन लो एक सामाजिक कार्यकर्ता है उन्होने बोला इसपे ॲक्शन लो आज इतने नगरसेवक समाजसेवक से अर्जी करते है उसपे कभी सुनवाई नही होती

है लेकिन एक आदमी के बोलने से प्रभाग अधिकारी और बाकी लोगो पे ॲक्शन होती है। ओनली होर्डिंग्ज लगाया है उस होर्डिंग्ज को निकालो और प्रभाग अधिकारी के पास बहुत काम होता है। प्रभाग अधिकारीनी दो दिन लेट कर दिया तो उसके उपर ॲक्शन लगाया और शास्ती लगाया आणि जसे लहाने साहेब बोलले समोरच्या व्यक्तीला चान्स खुलासा करण्याकरिता दिला पाहिजे. परंतु तसा खुलासा न करता त्यांनी एकतर्फी ती शास्ती लावली आहे. कोणाच्या तरी दबावाखाली प्रशासन बळी पडली आहे. तसे बळी पडले नाही पाहिजे. ठाम उभ राहायला पाहिजे. त्यामुळे ही शास्ती आहे ती फक्त ५० रुपये शास्ती आहे जास्त मोठी पण नाही त्यामुळे ती शास्ती रद्द करण्याकरिता ठराव मांडला आहे.

**दिप्ती भट :-**

मा. आयुक्तांनी दिले आहे तर विचार करुन ५० रुपये पॅनल्टी दिली असेल.

**वर्षा भानुशाली :-**

आपण कमिशनरच्या विरोधात जातो का?

**दिप्ती भट :-**

आम्ही कसे जाणार आम्हालाच उत्तर देत नाही.

**मा. सभापती :-**

ठराव करा.

**वर्षा भानुशाली :-**

ठरावामध्ये काय आहे शास्ती भरायची आहे का?

**राजीव मेहरा :-**

मा. सभापती साहेब कोई भी अधिकारी जवाब देना तो दूर फोन भी उठाते नही।

**राकेश शहा :-**

मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रात सार्वजनिक ठिकाणी व इतर ठिकाणी विनापरवानगी बॅनर लावू नये याबाबतचा ठराव मा. महासभेमध्ये सर्वानुमते मंजुर केल्यानंतर कोणत्याही राजकीय पक्षाने व राजकीय कार्यकर्त्याने बॅनर किंवा अनधिकृत होर्डींग्ज लावले नाहीत. नगरसेवकांनी व राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मा. महासभेच्या ठरावाचे पालन केले आहे.

प्रशासनाने श्री. कृष्णा गुप्ता यांच्या दबावाला बळी पडून चौकशी न करता महापालिकेच्या सर्व प्रभाग अधिका-यांवर शास्ती लावण्याची एकतर्फी कारवाई केल्याचे दिसून येत आहे. वास्तविक तक्रार प्राप्त झाल्यानंतर अधिकारी किंवा कर्मचा-यांकडून तक्रारीचा खुलासा मागविणे, नोटीस पाठविणे, कारणे दाखवा नोटीस देणे असे अपेक्षित असताना प्रशासनाने प्रभाग अधिका-यांवर शास्ती लावली आहे. हे नियमबाह्य असल्याने खालील अधिका-यांची चुकीचे व अन्यायकाराक लावलेली रद्द करण्याचा ठराव मांडत आहे.

**श्रीप्रकाश सिंह :-**

माझे अनुमोदन आहे.

**दिप्ती भट :-**

आमचे वेगळे वोटिंग असेल कारण ह्याच्यामध्ये जी.आर आहे. जी.आर मध्ये एक महिन्याच्या अगोदर कारण ह्याचे फॉलो अप मी पण करते. मी पण ह्याच्यासाठी भांडते जर आम्हाला पत्राचे उत्तर भेटत नाही. एक वेळेला बेलवटे साहेबांवर कारवाई त्याच्या अगोदर साहेबांना माझे बोलणे चुकीचे वाटले पण मी ज्या परिस्थितीमध्ये आहे त्यामुळे तसे सॅलरीचे शब्द वापरले. आमची वारंवार कम्पलेन्ट आहे एक बाजू ठरावामध्ये आम्ही देतो आणि एका बाजूमध्ये नाही. आयुक्त मेन आहेत त्यांना आम्ही कम्पलेंट करतो.

**धृवकिशोर पाटील :-**

मागे आम्ही ठराव मांडला तेव्हा हे वेगळ होत हे फक्त होर्डींग्ज लावले नाही. होर्डींग्ज लावले विदाऊट परमिशन त्या प्रभाग अधिकारीवर ॲक्शन होते गुन्हा छोटा असतो आणि मोठा असतो. छोटीशी बाब होती आणि त्याच्यात अधिका-यांनी असे म्हटले आहे की आम्हाला खुलासा करण्यासाठी चान्स दिला नाही. आम्हाला वेळ न देता ही शास्ती लावली आहे. त्याच्यामुळे हे करणे क्रमप्राप्त आहे. आपल्या स्टॅन्डिंग कमिटीपूढे हा विषय चुकीचा घेतलेला नाही. ॲक्टमध्ये तरतूद आहे एखादी शास्ती लागली आणि लागल्यानंतर तो व्यक्ती आपल्या समितीसमोर अपिल करु शकतो. वी आर इज ऑथोरिटी म्हणजे आपल्याकडे अपील करुन आपण ती शिक्षा माफ करावी किंवा ती शिक्षा कन्टीन्यू करावी आपण ही शिक्षा माफ केल्यानंतर पुन्हा हो आयुक्तांच्या कोर्टामध्ये जाईल आणि आयुक्त साहेब डिसाईड करतील ही शास्ती रद्द

करावी की न करावी. आपल्या सत्सत्विवेक बुध्दीला पटल म्हणून आपण केलेले आहे. आयुक्तांना नाही पटले तर आयुक्त हे कन्टीन्यू ठेवील.

**दिप्ती भट :-**

२०१५ मध्ये मी रिझाइन दिलेलं परत इलेक्शन लढली त्या इलेक्शनमध्ये अचानक आचार संहिता लावताना काही गुन्हा न करता लिगली पैसे भरल्यानंतर पण कोणाच्या पार्टीच्या प्रेशरमुळे अधिकाऱ्यानी आणि पोलिसांनी चूकीचे स्टेटमेंट देऊन एका निर्दोष व्यक्तीवर माझ्या भावावर त्याला २०१५ पासून आज किती वर्ष झाली आम्ही आता कोर्टमधून बाहेर निघाले. त्याची नोकरी गेली सर्व प्रॉब्लेम ह्या अधिकाऱ्यामुळे झाले. कोणाच्या पार्टीच्या प्रेशरमुळे त्यांनी हे डिसीजन घेतले. तो माणूस तिथे नव्हता. तो अधिकारी स्वप्नील सावंत आहे. आजपर्यंत त्या विधी मॅडमला ठेवले मला नाही वाटत त्या बरोबर फॉलोअप करत असतील. किती केस अशा पेंडींगच असतात ते कधी तिथे गेले पण नाही. हा माणूस आहेच नाही तरीपण पोलिसांनी चूकीचे स्टेटमेंट दिले आपल्या अधिकाऱ्यांनी पार्टीच्या प्रेशरमुळे चुकीचे स्टेटमेंट लिहिले आणि त्या स्टेटमेंटमुळे निर्दोष माणसाला सत्ता आली गेली पण त्या माणसाला खालीपिली पैसे पालिकेला भरले फक्त प्रभाग अधिकारी स्वप्निल सावंतमुळे आज एवढी वर्ष शिक्षा करावी लागली. कोणाला सांगायचे आम पब्लिक बोलतो त्याच्यावर आयुक्तांनी कारवाई केली तर चुकीचे नाही. तुम्ही पॉलिटीकल प्रेशरमुळे काम करत असाल तर ते चुकीचे आहे. तुम्हाला पण न्याय अन्याय बघायला पाहिजे. मी आज ६ महिन्यापासून सफर करते.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**दिप्ती भट :-**

माझा ह्या विषयावर निषेध नोंदवण्यात यावा.

**मा. सभापती :-**

निषेध नोंदवावा.

**नगरसचिव :-**

ठीक आहे.

**दिप्ती भट :-**

मी तुम्हाला ठराव देते.

**नगरसचिव :-**

ठरावाची गरज नाही. निषेध नोंदवतो. तुम्ही बोलतात ते येणारच.

**प्रकरण क्र. ७८:-**

**अधिकारी/कर्मचाऱ्यांना लावलेल्या शास्तीवर निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ६६ :-**

मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रात सार्वजनिक ठिकाणी व इतर ठिकाणी विनापरवानगी बॅनर लावू नये याबाबतचा ठराव मा. महासभेमध्ये सर्वानुमते मंजुर केल्यानंतर कोणत्याही राजकीय पक्षाने व राजकीय कार्यकर्त्याने बॅनर किंवा अनधिकृत होर्डींग्ज लावले नाहीत. नगरसेवकांनी व राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मा. महासभेच्या ठरावाचे पालन केले आहे.

प्रशासनाने श्री. कृष्णा गुप्ता यांच्या दबावाला बळी पडून चौकशी न करता महापालिकेच्या सर्व प्रभाग अधिकाऱ्यांवर शास्ती लावण्याची एकतर्फी कारवाई केल्याचे दिसून येत आहे. वास्तविक तक्रार प्राप्त झाल्यानंतर अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांकडून तक्रारीचा खुलासा मागविणे, नोटीस पाठविणे, कारणे दाखवा नोटीस देणे असे अपेक्षित असताना प्रशासनाने प्रभाग अधिकाऱ्यांवर शास्ती लावली आहे. हे नियमबाह्य असल्याने खालील अधिकाऱ्यांची चुकीचे व अन्यायकाराक लावलेली रद्द करण्याचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदन :- श्री. श्रीप्रकाश सिंग**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ७९, **मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (भांडार विभाग) - मालमत्ता कर विभागाची सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता कराची देयक छपाई करणे.**

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजूर.

**प्रकरण क्र. ७९ :-**

**मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (भांडार विभाग) - मालमत्ता कर विभागाची सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता कराची देयक छपाई करणे.**

ठराव क्र. ६७ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका मालमत्ता कर विभागाची सन 2019-20 या आर्थिक वर्षाकरिता कराची देयके छपाई करणेकामी मा . आयुक्त यांची मंजुरी घेऊन E-Tendering व्दारे तसेच वृत्तपत्रात जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आली होती . त्याकरिता पात्र निविदाधारकांनी सादर केलेल्या व त्यापैकी कमी दर असलेल्या निविदेस मा. उप-आयुक्त (भांडार) यांनी दि. 01/03/2019 रोजी मान्यता दिलेली आहे. मालमत्ता कर विभागाची सन 2019-20 या आर्थिक वर्षाकरिता कराची देयके छपाई करणेकामी अंदाजित रु.7,00,000/- च्या मर्यादेत खर्च अपेक्षित आहे.**

**तरी सदर कामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (ड) अन्वये सदर प्रकरणाचे अवलोकन करण्यात येत आहे.**

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८०, **मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (भांडार विभाग) - मिरा भाईंदर महानगरपालिका सन २०१९ ची दैनंदिनी छपाई करणे .** प्रकरण क्र. ८१, **मा. आयुक्त सो . यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. ( भांडार विभाग ) - मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना तसेच वाहनचालक यांना गणवेश (शिलाईसह) पुरवठा करणेबाबत.**

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ८० :-**

**मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (भांडार विभाग) - मिरा भाईंदर महानगरपालिका सन २०१९ ची दैनंदिनी छपाई करणे.**

ठराव क्र. ६८ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची सन 2019 ची दैनंदिनी छपाई करणेकामी मा . आयुक्त यांची मंजुरी घेऊन E-Tendering व्दारे तसेच वृत्तपत्रात जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आली होती. त्याकरिता पात्र निविदाधारकांनी सादर केलेल्या व त्यापैकी कमी दर असलेल्या निविदेस मा. उप-आयुक्त (भांडार) यांनी दि. 01/03/2019 रोजी मान्यता दिलेली आहे. महानगरपालिकेची सन 2019 ची दैनंदिनी छपाई करणेकामी अंदाजित रु. 6,00,000/- च्या मर्यादेत खर्च अपेक्षित आहे.**

**तरी सदर कामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (ड) अन्वये सदर प्रकरणांचे अवलोकन करण्यात येत आहे.**

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रकरण क्र. ८१ :-

**मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (भांडार विभाग) - मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यां ना तसेच वाहनचालक यांना गणवेश (शिलाईसह) पुरवठा करणेबाबत.**

ठराव क्र. ६९ :-

**मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी चतुर्थश्रेणी कर्मचा -यांना तसेच वाहनचालक यांना गणवेश (शिलाईसह) पुरवठा करणेकामी मा . आयुक्त यांची मंजुरी घेऊन E-Tendering व्दारे तसेच वृत्तपत्रात जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आली होती. त्याकरिता पात्र निविदाधारकांनी सादर केलेल्या व त्यापैकी कमी दर असलेल्या निविदेस मा . उप-आयुक्त (भांडार) यांनी दि. 08/07/2019 रोजी मान्यता दिलेली आहे . मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी चतुर्थश्रेणी कर्मचा -यांना तसेच वाहनचालक यांना गणवेश (शिलाईसह) पुरवठा करणेकामी अंदाजित रु. 10,00,000/- च्या मर्यादेत खर्च अपेक्षित आहे.**

**तरी सदर कामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (ड) अन्वये सदर प्रकरणांचे अवलोकन करण्यात येत आहे.**

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८२, **मा. आयुक्त सो. यांनी केलेल्या कामाचे अवलोकन करणे. (आपत्ती व्यवस्थापन विभाग) - मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन्मा . नगरसेवक यांच्या प्रभाग निधीमधून सी .सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत.** प्रकरण क्र.८३, **मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग)**

प्रकरण क्र. ८२ :-

**मा. आयुक्त सो. यांनी केलेल्या कामाचे अवलोकन करणे. (आपत्ती व्यवस्थापन विभाग) - मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन्मा. नगरसेवक यांच्या प्रभाग निधीमधून सी .सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत.**

ठराव क्र. ७० :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध प्रभागांमध्ये सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणेकामी आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. याकामी प्राप्त निविदांमध्ये मे. मिरॅकल इलेक्ट्रीकल्स सोल्यूशन्स इंडिया प्रा. लि. यांचे सर्वात कमी असल्याचे आढळून आले. सदर दरांमध्ये वाटाघाटी करून खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहे.

१. **मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग क्र. ०३ मध्ये भाईंदर (पू.) एस.व्ही. रोड, आर. एन. पी. पार्क व कस्तुरी पार्क येथे सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे (प्रभाग निधी) (Tender ID 2018_MBMC_449913_1)**

| अ. क्र. | तपशिल | मंजुर दर (सर्व करांसहीत) | परीमाण | एकूण |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | Supply and Installation for IP 2MP Bullet Outdoor Camera as per the Technical Specifications | रू. ६,४१३/- | १८ | रू. १,१५,४३४/- |
| २ | Supply and Installation for 4 channel NVR with 4 hdd support | रू. १०,२९०/- | ६ | रू. ६१,७४०/- |
| ३ | Supply and Installation 4 TB Internal SATA Hard Drive | रू. १९,५२६/- | ६ | रू. १,१७,१५६/- |
